म. ग्रं. मं. ठाणे
विषय
स. न
१८०३



REI BK-0000154

REFBK-0000154

श्री

# वैराग्यमाला.

हें

पुस्तक,

## रामचंद्र चिंतामण करंदीकर,

रहाणार नागोठणें, तालुका पेण,
जिल्हा कुलाबा यानें केलें तें

मुंबईत
'पार्वतीवरदा' छापखान्यांत छापून
प्रसिद्ध केलें.

प्रति १०००,

सन १९०३.

[ सर्व [illegible] स्वाधीन राखिले आहेत ]

किंमत दोन आणे.

# शोचनीय स्थिति.

ऐशी वस्तु न शोधितां त्रिभुवनीं लाधे प्रयत्नांहि ही ॥
जीचें मोल न वर्णवे कधिंहि तें जागा न संख्येत ही ॥
यत्सौख्या उपभोगण्या न मिळतें पुण्याइ वांचोनिया ॥
जीच्या वीण वधूस भूषण नसे सृष्टींत वांचोनिया ॥ १ ॥

पुण्याई सरली उमेद उरली नाहीं मुळीं अंतरीं ॥
दावूं तोंड कसें विना तिलक जो मद्भाल तें अतरी ॥
त्याच्या वीण मना कसें जगत हें शून्या परी भासतें ॥
दुःखें सर्व शरीर आर्द्र बनुनी हें वाटतें नासतें ॥ २ ॥

हा हा! दैवगती विचित्र किति ही पत्ता न लागे कधीं ॥
हे काला अदया जनां दुखविसी तूतें न कोणी वधी ॥
प्राणाहूनि अधीक मत्प्रिय पती त्यातें बळी घेउनी ॥
दुःखाग्नी मधिं लोटिता मज कसा संतोषसी तूं मनीं ॥ ३ ॥

शोधोनी नयनीं बघेन कधिं मी सप्रेम त्यातें पुन्हां ॥
दैवा काय असा तुझा चुकुनियां केला तरी मी गुन्हा ॥
शृंगारोनि शरीर हें किति तरी संतोषि मी होतसें ॥
हेमाचे नग, रत्न-हार बहुधा घालोनिया रे तसे ॥ ४ ॥

नाना रंग करोनि सौख्य समयीं ओष्ठामृतें मन्मना ॥
होई तोष न वर्णवे परि अता जाळी मना कामना ॥
शय्या देखुनि मानसीं सुख न तें संताप होई कसा ॥
अंगा लागुनि आग दुःखित पहा आत्मा हि होई तसा ॥ ५ ॥

पोटीं पुत्र न काय मी करुं तरी कंठूं कसा काळ हा ॥
देहाचें करण्यास सार्थक सुचे युक्ती न कैशी अहा ॥
तारुण्यें मज गांजिलें शर हृदीं मारी पहा हा किती ॥
हे मत्ता मदना असो नमन बा व्हावी मला सन्मती ॥ ६ ॥
वर्षा षोडश आक्रमीत असतां केला महा घात की ॥
मृत्यूनें अति क्रूर रूप धरुनी मेला महा घातकी ॥
कंठावा क्षण एक वर्ष सम तो वाटे मनाला तदां ॥
पत्नीतें पति वांचुनी सुख जगीं राहोनि नाहीं कदां ॥ ७ ॥
वार्ता ही परिसोनि मूर्च्छित पडे माता मदीया कशी ॥
दुःखें होरपळे पिता मम तसा वैधव्य आलें मशीं ॥
ठेवी मत्पितरां सुखी ह्मणुनियां प्रार्थीत नारायणा ॥
भेटावें ह्मणुनी तयां झडकरी आली मनीं प्रेरणा ॥ ८ ॥
भावोजी मज चैन ना किति तरी मी साहु शोकानला ॥
धाडावें न करा विलंब अजि हो मत्तात-गेहीं मला ॥
ख्याली पांडुरताचि शक्ति रहिता झाली अहा काय ही ॥
शोकें होरपळे ह्मणोनिच अशी झाली असे काय ही ॥ ९ ॥
माहेरीं मजला त्वरें दवडिलें ऐकोनि ही मद्गिरा ॥
तेथें राहुनि एक वर्ष भरही शांती न होई जरा ॥
कैसा हा मम जन्म शत्रु गमतो बंदींत ठेवी मला ॥
नोहे हा पुरुषार्थ सत्य छळिसी स्त्री ही असे दुर्बला ॥ १० ॥
झालें दुःख मला न आस कसली त्रासोनि गेल्यें हरी ॥
आहे मोक्षद नाम सत्य तव जें संसार तापा हरी ॥
लागो छंद मला तुझा प्रभुवरा स्पर्शो न दुर्वासना ॥
मातें जन्म नको अखंड तुझिया वांछीतसें दर्शना ॥ ११ ॥

**रामचंद्र चिंतामण करंदीकर,** गागोठणेंकर.

# द्रव्य-लोभ.

निर्धना जगतिं मान न देती ॥
योग्य ही परि नसे जन-रीती ॥
बुद्धि हीन नर त्या समजोनी ॥
अर्जवी परि न ऐकति कानीं ॥ १ ॥

दारिद्र्य झाकी अवघ्या गुणांना ॥
येती मनीं नित्य कुतर्क नाना ॥
तें मानवा संकट-फास लावी ॥
ही वेळ कोणास कधीं न यावी ॥ २ ॥

पूर्वीं असें पातक काय केलें ॥
या जन्मिं मातें अति दुःख झालें ॥
जाळी मन्म दु सह थोर चिंता ॥
कांहीं सुचेना करुं काय आता ॥ ३ ॥

द्रव्य-लोभ उपजे परि खोटा ॥
खास तो करितसे तरि तोटा ॥
कीर्तिला मग लयाप्रत नेतो ।
मानवा जगतिं घातक होतो ॥ ४ ॥

झुगारिलें या अवघ्या विचारां ॥
धना विना अन्य गमे न थारा ॥
अपार घेती धन कन्यकेचें ॥
किती असे निंद्यचि कर्म याचें ॥ ५ ॥

कां मनीं धरितसां धन-लोभा ॥
हें नसे उचित होइल शोभा ॥
जन्म देउनि तिला बुडवावें ॥
का बरें जगतिं निंद्य ठरावें ॥ ६ ॥
दुर्बुद्धि कां आठवली कळेना ॥
सांगू किती मानस हें वळेना ॥
पोरीकडे पाहुनि लोभ सोडा ॥
संतोष मानोनि यशास जोडा ॥ ७ ॥
सत्य होय विधि-लेख टळेना ॥
द्रव्य-लोभ करि घात पहाना ॥
का नये तव मना पतिराया ॥
लक्ष द्या विनविते प्रिय जाया ॥ ८ ॥
घेतां मुलीचें धन धन्य होई ॥
जें रौरवीं लोटुनि त्यास देई ॥
तें चोर एकाकि लुटोनि नेती ।
ललाट—रेषा न चुके युगांतीं ॥ ९ ॥
हा भास सारा जग सत्य नाहीं ॥
मी भ्रांति-डोहीं बुडतोंच पाही
श्रीपाद-पद्मीं मन नित्य ठेवा ॥
संसार-कारागृह ये न देवा ॥ १० ॥
द्रव्य-लोभ धरितां फसलों मी ॥
वासना परि जडो प्रभु-नामीं ॥
राघवा मजसि घेउनि अंकीं ॥
तार तूंच रुतलों भव-पंकीं ॥ ११ ॥

रामचंद्र चिंतामण करंदीकर, नागोठणेंकर.

# शुद्ध वेडेपण.

जी घे सत्कुलिं जन्म नित्य पितरां संतुष्ट राखी गुणें ॥
प्रेमाची करि नित्य वृद्धि परित्या माजी न पाडी उणें ॥
थोरां मानचि दे धरोनि विनया आज्ञेंत राहे सदा ॥
कन्या रत्न असें जयास मिळतें कां येइ त्या आपदा ॥१॥

मृदु वचें सुखवि जी वडिलांसी ॥
रमवि खेळुनि बहूत मुलांसी ॥
झडकरी करितसे बहु कामें ॥
म्हणतसे ' बसुं नयेचि रिकामें ' ॥ २ ॥

वर्षें सहा जाति अशी सुखानें ॥
चिंता पित्याच्या हरुनी सुखा ने ॥
मातेस ती झोंप जरा न लागे ॥
कोठें पहावा वर तो तुला गे ॥ ३ ॥

सच्छील, सान्वय, धूर्त, हुषार मोठा ॥
रूपीं नयेचि करितां मदनासि ताठा ॥
श्रीमंत ना परि असा वर योग्य साचा ॥
लागे न बोल पितरांस कधीं जनाचा ॥ ४ ॥

धनाढ्य परि वृद्ध जो रहितशक्ति कांपे सदा ॥
मुलीस सुख ना जरा मग कशास ती संपदा ॥
धरोनि अभिलाश ही बहु गुणी दिली कन्यका ॥
हसे मग जनीं ' पहा बुडवितोच हा अन्य का ' ' ॥ ५ ॥

लक्ष्मी वास करी सदोदित अशा सद्देहिं यावी गमे ॥
हेमाचे नग, रत्न हार मिळतां तत्काल तेथें रमे ॥
कन्या भूषित देखुनी विधि-बळें आल्हाद व्हावा मना ॥
माझी हौस असे खुशाल हसुद्या हो या दुर्लोंडी जना ॥ ६ ॥
वर्षें साठ मुखीं न दंत अवघ्या केशां दिसे शुभ्रता ॥
बोलेना अति शब्द कंपित तरी नोहेचि हे नम्रता ॥
द्रव्याला भुलुनी मुलीस पितरें ह्या थेरड्याला दिली ॥
हा बाळे, अबले खरोखर तुला वृद्धाकरीं वेरिली ॥ ७ ॥
येथें ना तुज सौख्य-लेशहि मिळे दुःखाब्धि गे हा असे ॥
स्वत्तातें दिधली अशा पति-करीं तेथें करावें कसें ॥
बाळे तूं असशी गुणी गरिबिनें राहे तयाच्या घरीं ॥
हा! हा! व्यर्थ मुली कसें फसविलें रक्षो तुला श्रीहरी ॥ ८ ॥
जाहलाचि अतिसार तयाला ॥
पीडितो बहु परी हृदयाला ॥
सोडिलें जग तई जरठानें ॥
घात! घात! वदु मी किति आनें ॥ ९ ॥
हा दैवा मज जन्मताचि वधिलें नाहीस तूं कां बरें ॥
गेला मत्पति टाकुनी मज जगीं शोकाब्धि हा नावरे ॥
बाबा काय वदूं लहान असतां वृद्धा करीं घातलें ॥
माते व्यर्थ धनार्थ कंठ चिरिता तूंतें बरें वाटलें ॥ १० ॥
हा! हा! वृथा शिणविली उपजोनि माता ॥
मत्पोषणीं श्रम अहा बहु होति ताता ॥
मी दैव हीन तरि मच्छिरिं दुःख राहे ॥
देवा खचींत मरण्यास तयार आहें ॥ ११ ॥

**रामचंद्र चिंतामण करंदीकर, नागोठणेकर.**

# मोह-पाश.

ठेवोनिया पुत्र, कलत्र देशीं ॥
जाई धना मेळविण्या विदेशीं ॥
भावी सुखाची मनिं फार आशा ॥
होई पहा कारण तेचि नाशा ॥ १ ॥

क्षणोक्षणीं दुर्जन अर्जवीले ॥
करोनि सेवा धन सांठवीलें ॥
त्वरें निघाला मग देशिं याया ॥
मनीं ह्मणे वाट बघेल जाया ॥ २ ॥

देशीं अवर्षण पडे अति कष्ट होती ॥
खाया न अन्न जन मृत्यु—पथास जाती ॥
प्रत्यक्ष काल करिं दंड धरोनि आला ॥
तेणें उजाड अति देश भयाण झाला ॥ ३ ॥

येई घरा तों मृत होति बाळें ॥
शोकानलें होउनि दग्ध लोळे ॥
तों पत्नि त्याची यम-पंथ सेवी ॥
दोघा मुलांना परि काल ठेवी ॥ ४ ॥

मुलां खावया देउनी तृप्त केलें ॥
करोनी विचारा मना आवरीलें ॥
त्वरें सर्व खर्चोनि संपत्ति थाटें ॥
करी लग्न आनंद चित्तास वाटे ॥ ५ ॥

पुन्हा द्रव्य-लोभें विदेशास जाई ॥
शरीरास तो कष्ट अनंत देई ॥
निशीं झोंप ये ना तया काळजीनें ॥
खरी दुष्ट माया भवाब्धींत जीने ॥ ६ ॥
द्वितीय भार्या करि जाच पोरां ॥
न दे कधीं मानहि थोरथोरा ॥
नसे गृहीं शांति सदैव भांडे ॥
सुकोनि गेलीं सु-कुमार तोंडें ॥ ७ ॥
त्रासलीं मग विभक्त रहाती ॥
वृत्त सर्व पितया कळवीती ॥
ऐकतां हृदय भंगुनि गेलें ॥
व्यर्थ हें खचित जन्मचि झालें ॥ ८ ॥
जों जों मनीं हांव धरी सुखाची ॥
सोडी न तें दु खचि पाठ त्याची ॥
पूर्वी जसें कर्म करोनि ठेवी ॥
भोगावया तत्फल जन्म दैवी ॥ ९ ॥
जगिं बधू, सुत, सुता-अभिषातें ॥
अमितपाक्षि-नर इच्छिति ज्यातें ॥
झडप घालुनि तयावरि जाती ॥
भुलति येन परि तें सुख हातीं ॥ १० ॥
सोडवी प्रभुवरा मज दीना ॥
मोह-पाश गुतवी सुटवेना ॥
हा असे शरण तार अनंता ॥
जन्म मृत्यु चुकवी परि आतां ॥ ११ ॥

रामचंद्र चिंतामण करंदीकर, नागोठणेंकर.

# रिपु-बंधन.

संसार—शत्रु करिं घेउनि खड्ग—माया ॥
हा दाटतो अवतरे जगिं या रमाया ॥
खेळापरी तुज गमे अवघा पसारा ॥
गेला पहा तुजमुळें मम जन्म सारा ॥ १ ॥

सज्जन्म-संपत्ति बळेंचि नेसी ॥
का व्यर्थ रे तू मम शत्रु होसी ॥
मित्रत्व केलें कपटासि आलों ॥
युद्धासि मी सिद्ध करीन घाला ॥ २ ॥

घेतों पहा ढाल—विवेक हातीं ॥
जी खास मायेचि करील माती ॥
त्वच्छूर सेनापति—वासनेतें ॥
जाळोनि निःशेष करीन हातें ॥ ३ ॥

क्रोध, लोभ, मद, मत्सर, मोहा ॥
छेदितो त्यजिति वीराचि देहा ॥
इंद्रियें-दश असे तव सेना ॥
पाश—निग्रहिं तरी गुतलीना ? ॥ ४ ॥

पेंढारि-रोग पळती धरिती न आशा ॥
जीवाचि, कैक पडती स्तविती नरेशा ॥
आता नसे तुजसि ठाव मुळीं लपाया ॥
बंदींत ठेविन तुला न मिळे फिराया ॥ ५ ॥

संताप कां व्यर्थ करोनि मोठा ॥
तूं जाळिसी देह धरोनि ताठा ॥
गेले किती ते नरकास मार्गे ॥
जाती पुढें " मी " म्हणताच वेगें ॥ ६ ॥
कलि-युगीं प्रबल होउं पहासी ॥
भुलति मायिक तुझ्या स्वरुपासी ॥
छळिसि त्या परि मला नच भीती ॥
शरण ये मजसि ही बरि रीती ॥ ७ ॥
पूर्व-संचित-बळें तुजला जे ॥
जिंकिती तरि तयां यम लाजे ॥
सोडितों तुज दया मज येई ॥
वृत्ति ही त्वरित सोडुनि देई ॥
संसार-जाल भव-सागरिं लावुनीयां ॥
पापी, अजाण नर-मीन धरी वधाया ॥
माया-शिलेवरतिं धीवर-देव ठेवी ॥
चौऱ्यांशि लक्ष मग जन्म-पथास लावी ॥ ९ ॥
आत्म-स्वरूपा जइं ओळखीलें ॥
तज्जन्म साफल्य खरेंचि झालें ॥
त्या मुक्ति माला करिं घेउनीया ॥
वाली त्वरें उत्सुक जी वराया ॥ १० ॥
धन्य एक नर तो जगिं होतो ॥
मार्ग हा हरि-पदाप्रत नेतो ॥
मानवा भ्रमित तूं जरि होसी ॥
सत्य सत्य नरकाप्रत जासी ॥ ११ ॥

**रामचंद्र चिंतामण करंदीकर, नागोठणेंकर.**

# एक वैरागी.

संसार ना सुखद दुःख-समुद्र पाहीं ॥
ठेला भरून सुसरी मगरादिकांहीं ॥
प्रत्यक्ष दोन सुसरी-ममता दुराशा ॥
ओढोनि नेति परि कारण होति नाशा ॥ १ ॥

काम--नक्र धरि सत्वर चावी ॥
क्रोध-मीन हि सदा दरडावी ॥
वासना -छलक सर्पिण बायां ॥
पाजिते विषय--वीष मराया ॥ २ ॥

माता, पिता, सुत, सुता, भगिनी, प्रिया हीं ॥
मायेंत गुंतविति हे परि मूल पाहीं ॥
संपत्ति, मंदिर अखेर न येइ कामा ॥
जा एकला रहित काय तसा रिकामा ॥ ३ ॥

पडे भ्रांति-अंधार कांहीं दिसेना ॥
अहंकार--चोरें हि नेलें कळेना ॥
प्रपंचांत मी व्यर्थ गुंतोनि गेलों ॥
वृथा मूढ हा मूढ जन्मास आलों ॥ ४ ॥

व्यर्थ मी धरिलि हांव धनाची ॥
तृप्ति होइ न कधींहि मनाची ॥
कष्ट हे अति दिले जरि देहा ॥
आणिले कुटिल-षड्रिपु गेहा ॥ ५ ॥

काम हा खिळि शरीर शरांनीं ॥
पीडिलें बहु परी मज यांनीं ॥
क्रोध लोभ मज लोटिति डोहीं ॥
हे प्रभो तुजविणें गति नाहीं ॥ ६ ॥
पारमार्थिक सुखा मिळवाया ॥
योग्य एकचि असे नर-काया ॥
भूवरी अमित हे पशु--देही ॥
सत्य सत्य तरि त्यां गति नाहीं ॥ ७ ॥
योनींत नाना बहु हिंडलों मी ॥
पुण्याइ योगें नर--देह नामी ॥
लाधे परी गुंतुनि मोह--पाशा ॥
मी मेळवीना चिर--सौख्य- लेशा ॥ ८ ॥
देवा तुझें नाम मुखीं न आलें ॥
निंदा कराया परि गुंतवीलें ॥
हा देह मोहें बहु भागवीला ॥
त्वत्कीर्तिनीं ना कधिं जागवीला ॥ ९ ॥
संसार हा मज नको अति दुःखि झालों ॥
भावें प्रभो शरण मी तुजलागिं आलों ॥
मायीक खेळ अवघा नच सत्य कांहीं ॥
ठेवीं मला तव पदीं मग भीति नाहीं ॥ १० ॥
संसार सागर असे तरि नाव तूं हो ॥
त्वन्नाम- साधन करी तरण्या पहाहो ॥
नेई मला जल--थडीस दयाब्धिदेवा ॥
व्हावी तुझी मजकडून अखंड सेवा ॥ ११ ॥

रामचंद्र चिंतामण करंदीकर, नागोठणेंकर

# आत्म-बोध.

मी कोण, कोठून, कशास आलों ॥
संसार-मार्गांत भुलोनि गेलों ॥
कोणी मला जन्म दिला, कशाला ॥
हें ना कळे कां मज मानवाला ? ॥ १ ॥

भव—वनीं विषय—वृक्ष कसे हे ॥
लवति; काम—फल-भार न साहे ॥
क्षुधित मी नच करोनि विचारा ॥
अमित सेवित सुखा नच थारा ॥ २ ॥

लोभ—निर्झरहि काम—कपाटीं ॥
वाहुनी मजसि सत्वर लोटी ॥
दुःख—डोहि पडतां भ्रम होई ॥
क्रोध-लाट मग फेंकुनि देई ॥ ३ ॥

तेव्हा पडें मोह—रणीं जरी मी ॥
आणी तरी शक्ति ममत्व-रश्मी ॥
लागे तई ऐहिक-सौख्य-तृष्णा ॥
पाडी तमा होउनि बुद्धि कृष्णा ॥ ४ ॥

द्रुत मनोमृग तृषाकुल धावे ॥
सबल काम जल लाभत दैवें ॥
बहुत पान करितां सुख कैचें ! ॥
नर न हे पशु, कृतघ्नचि साचे ! ॥ ५ ॥

निर्मी तया विसरती भुलती भवाला ॥
कर्तव्य काय नकळे भ्रम खास झाला ॥
हा काम-राक्षस बळी किति देह घेई ॥
जीवास जन्म-नरकीं मग सत्य नेई ॥ ६ ॥
भूतजात अवघें उपजे हें ॥
ब्रह्म कारण तया जरि आहे ॥
होउनी पटल ही भव-माया ॥
आणितेच परि जीव-दशे या ॥ ७ ॥
घटाकार ये मृत्तिका मूळ त्याचें ॥
जरी भग्न तो रूप तें मृत्तिकेचें ॥
शिजे अग्निसंगें तई भिन्न होई ॥
तसें ब्रह्म हें जीव-भावास येई ॥ ८ ॥
मायाग्निसंगें जरि भिन्न होई ॥
मिथ्यत्व तें सत्यपणास घेई ॥
रज्जू परी सर्प ह्मणोनि भीतो ॥
ज्ञानें वृथा भास लयास जातो ॥ ९ ॥
ज्ञान-सूर्य हृदयाचलिं येई ॥
अज्ञता-तिमिर नाशचि होई ॥
ब्रह्मरूप अवघें मग झालें ॥
द्वैत सर्व विलयाप्रत गेलें ॥ १० ॥
विभ्रमें विसरला स्वरुपाला ॥
कोण मी नुमजतें तरि त्याला ॥
ज्ञानवान परि एक विरागी ॥
आपुलेंचि सुख आपण भोगी ॥ ११ ॥

**रामचंद्र चिंतामण करंदीकर, नागोठणेंकर.**

नवीन! नवीन!! नवीन!!!

# योग्यशासन नाटक.

कर्ता

रामचंद्र चिंतामण करंदीकर

नागोठणेंकर.

हें पुस्तक ह्मणजे व्यवहाराचें चित्र आहे शि-
वाय मनुष्यानें कसें दक्षतेनें वागावें हें
ह्यावरून चांगलें कळेल.

**********************************

सूचना.

पुस्तकें मिळण्याच्या ठिकाणाबद्दल 'केसरी' अगर 'मुंबईवैभव' पत्रांतील जाहिरात पाहावी.

पुस्तककर्ता.

यामुळें मूळ अर्थांत क्वचित् न्यूनाधिक भाव झालासा भासेल तथापि तो तात्पर्यार्थास वैगुण्य आणणारा किंवा विशोभित दिसणारा असा न व्हावा याविषयीं ठेववेल तितकी सावधगिरी ठेविली आहे.

याप्रमाणे हें भाषांतर यथामति केलें आहे. यांत दोष व चुक्या असतील त्यांजकडे लक्ष्य न देतां सहृदय विद्वज्जनांनीं प्रेमपुरःसर याचा अंगीकार करावा अशी त्यांस विनयपूर्वक प्रार्थना आहे.

**भाषांतरकार.**

१५८

# ॥ महिम्नप्रारंभः ॥

## श्लोक.

महिम्न:पारंतेपरमविदुषोयद्यसदृशी
स्तुतिर्ब्रह्मादीनामपितदवसन्नास्त्वयिगिरः ॥
अथावाच्य:सर्वःस्वमतिपरिणामावधिगृण
न्ममाप्येष;स्तोत्रेहरनिरपवाद:परिकरः ॥ १ ॥

## शिवपर.

हरा[1] ब्रह्मेंद्रादि त्रिदेशवर[2] वर्णूं न शकती ॥
तुझ्या ऐश्वर्यातें, मग इतर ते पामर किती ॥
तरी गातां नोहे अनुचित जसें येइल तसें ॥
ह्मणोनी हा स्तोत्रोद्यम ममहि निंदास्पद नसे ॥ १ ॥

## विष्णुपर.

हरे ब्रह्मेशादि त्रिदशवर वर्णूं न शकती ॥
तुझ्या ऐश्वर्यातें, मग इतर ते पामर किती ॥
तरी गातां नोहे अनुचित जसें येइल तसें ॥
ह्मणोनी हा स्तोत्रोद्यम ममहि निंदास्पद नसे ॥ १ ॥

---

१ (संबोधन). २ देवश्रेष्ठ.

श्लो० अतीतःपंथानंतवचमहिमावाङ्मनसयो
रतद्व्यावृत्त्यायंचकितमभिधत्तेश्रुतिरपि ॥
सकस्यस्तोतव्यःकतिविधगुणःकस्यविषयः
पदेत्वर्वाचीनेपततिनमनःकस्यनवचः ॥ २ ॥

शि० मनोवाचातीत प्रथितमहिमा शंकर दिसे ॥
निषेधें दृश्याच्या श्रुतिहि बिहुनी ज्या कथितसे ॥
तया कोणी गावें? अमित गुण त्याचे न कळती ॥
मनाची वाणीची गति निखिल दृश्यींच घडती ॥ २॥

वि० मनोवाचातीत प्रथितमहिमा माधव दिसे ॥
निषेधें दृश्याच्या श्रुतिहि बिहुनी ज्या कथितसे ॥
तया कोणी गावें? अमित गुण त्याचे न कळती ॥
मनाची वाणीची गति निखिल दृश्यींच घडती ॥ २॥

श्लो० मधुस्फीतावाचःपरमममृतंनिर्मितवत
स्तवब्रह्मन्किंवागपिसुरगुरोर्विस्मयपदम् ॥
ममत्वेतांवाणींगुणकथनपुण्येनभवतः
पुनामीत्यर्थेऽस्मिन्पुरमथनबुद्धिर्व्यवसिता॥ ३ ॥

शि० श्रुती ज्याची वाणी मधुर अमृताहूनि विलसे ॥
रुचे त्याच्या चित्ता वचन गुरुचेंही मग कसें ? ॥
घडो वाचाशुद्धी गुणकथनपुण्यें तव हरा ॥
असा हेतू माझ्या मनिं खचित कांहीं न दुसरा ॥३॥

वि० श्रुती ज्याची वाणी मधुर अमृताहूनि विलसे ॥
रुचे त्याच्या चित्ता वचन गुरुचेंही मग कसें ? ॥
झडो वाग्दोष त्वद्गुणकथनपुण्यें मम खरा ॥
असा हेतू माझ्या मनिं मुररिपो नाहिं दुसरा ॥ ३ ॥

---

१ (सबोधन).

श्लो० तवैश्वर्यंयत्तज्जगदुदयरक्षाप्रलयकृत्
त्रयीवस्तुव्यस्तंतिसृषुगुणभिन्नासुतनुषु ॥
अभव्यानामस्मिन्वरदरमणीयामरमणीं
विहंतुंव्याक्रोशींविदधतइहैकेजडधियः ॥ ४ ॥

शि० प्रभो विश्वोत्पत्त्यादिक गुणवशें तूंचि करिसी ॥
तुझ्या मूर्ती ब्रह्मादिक तिन वदे वा श्रुति असी ॥
असा शंभो अर्थ प्रकट असतां सम्मत भला ॥
तरी कैसी एतद्विषयिं निपजे दुर्मति खला ॥ ४ ॥

वि० हरे विश्वोत्पत्त्यादिक गुणवशें तूंचि करिसी ॥
तुझ्या मूर्ती ब्रह्मादिक तिन वदे वा श्रुति असी ॥
असा विष्णो अर्थ प्रकट असतां सम्मत भला ॥
तरी कैसी एतद्विषयिं निपजे दुर्मति खला ॥ ४ ॥

श्लो० किमीहःकिंकायःसखलुकिमुपायस्त्रिभुवनं
किमाधारोधातासृजतिकिमुपादानइतिच ॥
अतर्क्यैश्वर्येत्वय्यनवसरदुःस्थोहतधियः
कुतर्कोऽयंकांश्चिन्मुखरयतिमोहायजगतः ॥ ५ ॥

शि० वसे स्रष्टा[1] कोठें स्थिरचरजगाचा ? करि कसें ॥
कशाचें हें विश्व ? स्थितिविलयही वर्तति कसे ॥
कुतर्कातें ऐशापरि करिति तूं ईश असतां ॥
अचिंत्यात्मा, होतो भ्रम कुमतिलोकांस भलता ॥ ५ ॥

वि० वसे स्रष्टा कोठें स्थिरचरजगाचा ? करि कसें ॥
कशाचें हें विश्व ? स्थितिविलयही वर्तति कसे ॥
कुतर्कातें ऐशापरि करिति तूं ईश असतां ॥
अचिंत्यात्मा, होतो भ्रम कुमतिलोकास भलता ॥ ५ ॥

---

१ उत्पन्न करणारा.

श्लो० अजन्मानोलोकाःकिमवयववंतोऽपिजगता
मधिष्ठातारंकिंभवविधिरनादृत्यभवति ॥
अनीशोवाकुर्याद्भुवनजननेकःपरिकरो
यतोमंदास्त्वांप्रत्यमरवरसंशेरतइमे ॥ ६ ॥

शि० न कीं लोकां जन्म स्फुट अवयवी होउनि खरें ॥
घडे कीं कर्त्यावांचुनिहि जगदुत्पादन बरें ? ॥
अनीशाला विश्वोद्भवविलय हे केवि घडती ? ॥
न जाणों कैसे त्वद्विषयिं नर संदेह धरिती ॥ ६ ॥

वि० न कीं लोका जन्म स्फुट अवयवी होउनि खरें ॥
घडे कीं कर्त्यावांचुनिहि जगदुत्पादन बरें ? ॥
अनीशाला विश्वोद्भवविलय हे केवि घडती ?
न जाणों कैसे त्वद्विषयिँ नर संदेह धरिती ॥ ६ ॥

श्लो० त्रयीसांख्यंयोगःपशुपतिमतंवैष्णवमिति
प्रभिन्नेप्रस्थानेपरमिदमदःपथ्यमितिच ॥
रुचीनांवैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां
नृणामेकोगम्यस्त्वमसिपयसामर्णवइव ॥ ७ ॥

शि० मतें लोकीं भिन्नें असति शिवविष्णवादि बहुत ॥
रुचे त्यांमाजी जें अनुसरति त्या मानुनि हित ॥
प्रभो तूतें अंतीं सकळ मिळती जेंवि सरिता ॥
समुद्रातें साऱ्या ऋजुकुटिलमार्गें विचरतां ॥ ७ ॥

वि० मतें लोकीं भिन्नें असति शिवविष्णवादि बहुत ॥
रुचे त्यांमाजी जें अनुसरति त्या मानुनि हित ॥
प्रभो तूतें अंतीं सकळ मिळती जेंवि सरिता ॥
समुद्रातें साऱ्या ऋजुकुटिलमार्गें पसरतां ॥ ७ ॥

---

१ असमर्थाला २ पसरतां

श्लो० महोक्षःखट्वांगंपरशुरजिनंभस्मफणिनः
कपालंचेतीयत्तववरदतंत्रोपकरणम् ॥
सुरास्तांतामृद्धिंदधतितुभवद्भूप्रणिहितां
नहिस्वात्मारामंविषयमृगतृष्णाभ्रमयति ॥ ८ ॥

शि० कुऱ्हाडा, राखाडी, वृष, फणि, तसीं कातडिँ जुनीं॥
कपाळें, गा[1]ळें, ही तव वरद सामग्रि सदनीं ॥
कटाक्षें सपत्ती तवचि मिळते निर्जरगणां ॥
न मोहातें देती विषय कधिँही स्वात्मरमणा ॥ ८ ॥

वि० मोठें घाक कु[2]ऱ्हाड शख अहिची शय्या उशी यापरी॥
सामग्री अति तुच्छ गेहिँ, तरि तूं भ्रूक्षेपयोगें हरी ॥
देशी देवगणां समृद्धि विविधा तूतें न तद्वासना ॥
आत्मारामचि जो तयास विषयेच्छा ना कधीं बाधिना॥८॥

श्लो० ध्रुवंकश्चित्सर्वंसकलमपरस्त्वध्रुवमिदं
परोध्रौव्याध्रौव्येजगतिगदतिव्यस्तविषये ।
समस्तेऽप्येतस्मिन्पुरमथनतैर्विस्मितइव
स्तुवन्जिह्रेमित्वांनखलुननुधृष्टामुखरता ॥ ९ ॥

शि० वदे कोणी सारे ध्रुव[3] जग असे, अध्रुव[4] दुजा ॥
तसें दोन्हीं धर्मैकरुनि युतँ[5] ऐशापरि तिजा ॥
अशा वादें भ्रांतीमधिँ पडुनियां लज्जित मनीं ॥
स्तवीतों तत्रापी तुज वरद वाचाळ ह्मणुनी ॥ ९ ॥

वि० वदे कोणी सारें ध्रुव जग असे, अध्रुव दुजा ॥
तसें दोन्ही धर्मैकरुनि युत ऐशापरि तिजा ॥
अशा वादें भ्रांतीमधिँ पडुनियां लज्जित मनीं ॥
स्तवीतों तत्रापी तुज वरद वाचाळ ह्मणुनी ॥ ९ ॥

---

१ खट्वांगें २ परशु ( परशुरामावतारीं ). ३ नित्य. ४ अनित्य ५ नित्यानित्य ( मिश्र. )

श्लो० तवैश्वर्यंयत्नाद्यदुपरिविरिंचोहरिरधः
परिच्छेत्तुंयातावनलमनलस्कंधवपुषः ॥
ततोभक्तिश्रद्धाभरगुरुगृणद्भ्यांगिरिशयत्
स्वयंतस्थेताभ्यांतवकिमनुवृत्तिर्नफलति ॥१०॥

शि० विराड्रूपा तूझी सकलहि कळायास विभुता ॥
अधोभागीं विष्णू अणि कमलभू जाय वरता ॥
न लागे जैं अंत, स्तविति तुज तैं तूंचि मग यां ॥
स्वरूपा दावीसी, सफल तव सेवाच सदया ॥ १० ॥

वि० ब्रह्मा ऊर्ध्व, फणीश खालिँ, तव हे तेजःस्वरूपा हरे ॥
शोधीती अवधी तयां न गवसे तैं होति ते स्तब्धरे ॥
तूतें जैं स्तविती तुवांचि सकृपें त्यांना दिलें दर्शना ॥
त्वत्सेवा वद कोणतें फल जनीं भक्तांप्रती देइना?॥१०॥

श्लो० अयत्नादापाद्यत्रिभुवनमवैरव्यतिकरं
दशास्योयद्बाहूनभृतरणकंडूपरवशान् ॥
शिरःपद्मश्रेणीरचितचरणांभोरुहबलेः
स्थिरायास्त्वद्भक्तेस्त्रिपुरहरविस्फूर्जितमिदम् ॥११॥

शि० त्रिलोकीचे राज्या सहज मिळवी रावण बळी ॥
नसे वैरी कोणी ह्मणुनि भुजकंडू न जिरली ॥
शिरःपद्मा वाही तव चरणिँ तेणेंचि वहिला ॥
असा ऐश्वर्याचा अनुपम तया लाभ घडला ॥ ११ ॥

त्रि० त्रैलोक्याधिपतित्व रावण करी निष्कंटकत्वें स्वतां ॥
गेहद्वारिं उभा सदैव बलिच्या तू राहसी तत्वतां ॥
अत्युत्कृष्ट असें घडे फल हरे प्राग्जन्मिँ या जन्मिँ वा ॥
केली अव्यभिचारि भक्ति चरणीं तूझ्यां तिचें जाणवा ११

---

१ ब्रह्मा २ यांस ( ब्रह्मविष्णूंस ) ३ भक्तीचें ( हें फल )

श्लो० अमुष्यत्वत्सेवासमधिगतसारंभुजवनं
बलात्कैलासेऽपित्वदधिवसतौविक्रमयतः ॥
अलभ्यापातालेऽप्यलसचलितांगुष्ठशिरसि
प्रतिष्ठात्वय्यासीत्ध्रुवमुपचितोमुह्यतिखलः ॥१२॥

शि० बलाच्या गर्वें तो तव[1]चि उचलूं पाहि गिरि[2]लौं ॥
तदा अंगुष्ठाग्रें सहज वरदा तूं दडपिला ॥
तया पाताळींही स्थळ तँव मिळेना पशुपते ॥
खळाला संपत्ती अतिशयित उन्मत्त करिते ॥ १२ ॥

वि० सारेंही जग हें तुझेंचि असता तें आपुलें मानुनी ॥
तूतें दान करी बली, तँव तुवां अन्याय हा पाहुनी ॥
अंगुष्ठाग्र शिरीं हळू हलवितां गेला बली खालतीं ॥
दुष्टा वाढविलें तरी विसरतो मोहोनि तो स्वस्थिती॥१२

श्लो० यदृद्धिंसुत्राम्णोवरदपरमोच्चैरपिसतीं
मधश्चक्रेबाणःपरिजनविधेयत्रिभुवनः ॥
नतच्चित्रंतस्मिन्वरिवसितरित्वच्चरणयो
र्नकस्याप्युन्नत्यैभवतिशिरसस्त्वय्यवनतिः ॥ १३ ॥

शि० सुरश्रीतें बाणासुर तव कृपे धिक्कृत करी ॥
जयाच्या आज्ञेला सकल जग दासापरि करी ॥
न वाटे आह्मा हें नवल नमवी[3] जो निजशिरा ॥
पदीं तुझ्या, त्याला सहज असि ये उन्नति हरा॥१३॥

वि० महेंद्राचा बाण त्रिभुवन जिणोनी अणितसे ॥
अपारा संपत्ती, जग सकल आज्ञ कारतसे ॥
नसे हें आश्चर्य प्रभुवर तुझ्या पादकमलीं ॥
धरी नम्रत्वा त्या सहजचि वरी उन्नति भली ॥ १३ ॥

---

१ तुझ्या. २ गिरिला ( कैलासाला ) ३ लववी.

श्लो० अकांडब्रह्मांडक्षयचकितदेवासुरकृपा
विधेयस्यासीद्यस्त्रिनयनविषंसंहृतवतः ॥
सकल्माषःकंठेतवनकुरुतेनश्रियमहो
विकारोऽपिश्लाघ्योभुवनभयभंगव्यसनिनः ॥ १४॥

शि० अकालीं ब्रह्मांडक्षय गणुनि देवादिक भिती ॥
विषा प्राशूनी तूं सदय हरिशी सर्वहि भिती ॥
गळा शोभे काळा बहुत विषयोगें तव जरी ॥
जगद्रक्षाकर्त्या विकृतिहि विभो भूषित करी ॥ १४ ॥

वि० अकालिँ जल वाढुनी जग हरे बुडू लागलें ॥
सुरासुरनरादिक प्रकट भीतिला पावले ॥
वराहतनु घेउनी सदय तूं धरे तारिलें ॥
तदा चिखल लागुनी तव शरीर वा माखलें ॥ १४॥

या श्लोकावर २ चरण विशेष केले आहेत ते असे—

तरी स्तविति ते तुला विमल तू ह्मणोनी कवी ॥
जगद्भयविनाशका विकृतिही खरें भूषवी ॥

श्लो० असिद्धार्थानैवक्वचिदपिसदेवासुरनरे
निवर्तंतेनित्यंजगतिजयिनोयस्यविशिखाः ॥
सपश्यन्नीशत्वामितरसुरसाधारणमभू
त्स्मरःस्मर्तव्यात्मानहिवशिषुपथ्यःपरिभवः॥ १५॥

शि० जया जिंकूं पाहे मदन नियमें त्या जिणि बळें ॥
तयानें गर्वानें तुज इतर देवांत गणिलें ॥
तदा झाला भस्म त्रिपुरदहना तो झडकरी ॥
समर्थांची ईर्ष्या जगतिँ कवणालाहि न बरी ॥ १५ ॥

वि० ज्याचे बाण कधीं न निष्फळ जगीं देवांहि जे जिंकिती ॥
जन्मा ये मृत काम तो त्वदुदरीं ऐसें वदेरे श्रुती ॥
रूपें तो तुजतुल्य, अतर तुह्मां दोघांमधें हें खरें ॥
होतो बंधनहेतु काम भजकां मोक्षास तू देशिरे ॥ १५ ॥

श्लो० महीपादाघाताद्व्रजतिसहसासंशयपदं
पदंविष्णोर्भ्राम्यद्भुजपरिघरुग्णग्रहगणम् ॥
मुहुर्द्यौर्दौस्थ्यंयात्यनिभृतजटाताडिततटा
जगद्रक्षायैत्वंनटसिननुवामैवविभुता ॥ १६ ॥

शि० पदाघातें भूमी, करचलनयोगें नभ, तसें ॥
धरी स्वर्ग क्लेशाप्रति बहुजटाताडनवशें ॥
जगद्रक्षेसाठीं परि करिसि नृत्या सुरनुता[2] ॥
असी विश्वेशा रे तव अतिविचित्राचि विभुता ॥ १६ ॥

वि० अन्यायी नृपती क्षितीस करिती पीडा अनेका रिती ॥
पात्रें फोडुनि वेदिका तुडविती यज्ञास विध्वंसिती ॥
पाखंडी सुरलोक नाहिँ ह्मणती, ऐसी स्थिती होयरे ॥
तैं मत्स्याद्यवतार घेउनि जना तू पाळिसी बा हरे ॥ १६ ॥

दुसरा श्लो० इच्छावशें इच्छित तें कराया ॥
असे तुला शक्ति सुराधिराया ॥
तरी जगद्रक्षण हें कराया ॥
नटापरी घेसि तनूस वाया ॥ २ ॥

श्लो० वियद्व्यापीतारागणगुणितफेनोद्गमरुचिः
प्रवाहोवारांयःपृषतलघुदृष्टःशिरसिते ॥
जगद्द्वीपाकारंजलधिवलयंतेनकृतमि
त्यनेनैवोन्नेयंधृतमहिमदिव्यंतववपुः ॥ १७ ॥

---

१ मेलेला काम त्वदुदरीं जन्मा ये असा अन्वय   २ देवस्तुता ( हें संबोधन. )

शि० वियद्व्यापी मोठा जलनिवह तुझ्या शिरिँ असे ॥
प्रभो तो अत्यत प्रकट लघु बिंदूपरि दिसे ॥
जग द्वीपाऐसें जिथ[1] वलय ज्याला जलधिचें ॥
अशानें कल्पावें प्रभुवर तुझ्या मान वपुचें ॥ १७ ॥

वि० आकाशासहि वेढि गांग जल जें फेनापरी तारका ॥
ज्यामाजी दिसती समुद्र भरुनी गेला जयानें निका ॥
वेटाचे परि ज्यांत हें जग दिसे ऐसा प्रवाह स्फुट ॥
बिंदूचे परि यत्पदीं, तनु असी [2]त्रैविक्रमी उद्भट॥१७॥

श्लो० रथःक्षोणीयंताशतधृतिरगेंद्रोधनुरथो
रथांगेचंद्रार्कौरथचरणपाणिःशरइति ॥
दिधक्षोस्तेकोऽयंत्रिपुरतृणमाडंबरविधि
र्विधेयैःक्रीडंत्योनखलुपरतंत्राःप्रभुधियः ॥ १८ ॥

शि० रथ क्षोणी, चाकें विधु रवि, विधी सारथि पहा ॥
धनुष्य स्वर्णाद्री, प्रखरतर तो बाण मुरहा[3] ॥
असी जाळायाला [4]त्रिपुरतृण सामग्रि करिसी ॥
स्वतंत्रस्वामीची प्रभुवर जगीं गोष्टचि असी ॥ १८ ॥

वि० चाकें ज्यास रवींदुंचे परि असा क्षोणीपरी थोरला ॥
शोभे स्यंदन, बाण आत्मसमही तेजें बहू आगळा ॥
शेषाचे परि दोरि, मेरुसम तें चाप, स्वयभूसम ॥
सूत श्रेष्ठ असी तुवां प्रभुवरें तैं सिद्धता उत्तम ॥१८॥
(२ श्लो० अर्धा ) केलीसे तृणरूप तीनतनुतें जाळा-
वयाला स्वयें ॥ जे होती प्रभु ते यथेच्छ करिती क्रीडेस
बा निश्चयें ॥

१ ज्या जलनिवहांत समुद्रवलयांकित जग द्वीपाऐसें असा अन्वय-
२ त्रिविक्रमावतारीची. ३ विष्णु. ४ त्रिपुररूप तृण वास जाळायाला

श्लो० हरिस्तेसाहस्रंकमलबलिमाधायपदयो
र्यदेकोनेतस्मिन्निजमुदहरन्नेत्रकमलम् ॥
गतोभक्त्युद्रेकःपरिणतिमसौचक्रवपुषा
त्रयाणांरक्षायैत्रिपुरहरजागर्त्तिजगताम् ॥ १९ ।

शि० सहस्रां पद्मानीं प्रतिदिनिँ पुजी त्वत्पद हरी ॥
उणें येतां एक स्वैंनयनसरोजार्पण करी ॥
अशा भक्तीचें त्या फल वरद चैक्रात्मक मिळे ॥
तयाच्या योगानें हरि करि जगद्रक्षण बळें ॥ १९ ॥

वि० इंद्रें दर्शन घेउनी दशशतीं नेत्रीं तुला पूजिलें ॥
स्वर्गाचें अधिपत्य थोर तव त्या एणेंचि कीं पातलें ॥
लक्ष्मी कौस्तुभ मुख्य रत्नगणही अब्धींतुनी लाधला॥
भक्तीचा परिणाम हा तव जगद्भूत्यर्थ कीं जाहला॥ १९॥

श्लो० क्रतौसुप्तेजाग्रत्त्वमसिफलयोगेक्रतुमतां
क्वकर्मप्रध्वस्तंफलतिपुरुषाराधनमृते ॥
अतस्त्वांसंप्रेक्ष्यक्रतुषुफलदानप्रतिभुवं
श्रुतौश्रद्धांबद्धादृढपरिकरःकर्म्मसुजनः ॥ २० ॥

शि० प्रभो सारीं कर्में क्षणिक, फल तीं देतिल कसीं ॥
परी तत्साफल्यीं तुँचि फलद जामीन असती ॥
ह्मणोनी या लोकीं श्रुतिवचनिँ विश्वासुनि जन ॥
करीती उत्साहा धरुनि मनिँ विध्युक्त यजन ॥ २० ॥

वि० हरे सारीं कर्में क्षणिक, फल तीं देतिल कसीं ॥
परी तत्साफल्यीं तुँचि फलद जामीन असती ॥

---

१ आपलें नेत्ररूप जें कमल त्याचें अर्पण २ सुदर्शन याच प्रसंगीं विष्णूस शिवानें दिलें. ३ त्या चक्राच्या योगानें.

ह्मणोनी या लोकीं श्रुतिवचनिँ विश्वासुनि जन ॥
करीती उत्साहा धरूनि मनिँ विध्युक्त यजन ॥२०॥
श्लो० क्रियादक्षोदक्षःक्रतुपतिरधीशस्तनुभृता
मृषीणामार्त्विज्यंशरणदसदस्याःसुरगणाः ॥
क्रतुभ्रेषस्त्वत्तःक्रतुफलविधानव्यसनिनो
ध्रुवंकर्तुःश्रद्धाविधुरमभिचारायहिमखाः ॥ २१ ॥
शि० स्वयें कर्मीं दक्ष क्रतुपति करी दक्ष यजन ॥
ऋषी ऋत्विग् जेथें नचि अणु उणें सभ्य सुमन ॥
तयाचा तूंची वा यजनफलदा नाश करिसी ॥
जगीं श्रद्धाहीन क्रतु करिति त्यांची गति असी ॥ २१ ॥
त्रि० वली दैत्यराजा क्रियादक्ष ज्याचीं ॥
पटू इंद्रियें सर्वही होतिँ साचीं ॥
करी याग ऋत्विग् मुनी थोर थोर ॥
जिथें सभ्यही ज्ञानसिंधू अपार ॥२१॥
दुसरा श्लोक ॥ तयाचा क्रतुभ्रंश तूझ्याचि हातें ॥
स्वयें देशि जो कां क्रतूच्या फलातें ॥
जगीं विष्णुभक्तांस जे कां छळीती ॥
अनिष्टार्थ देणार त्यां याग होती ॥ २ ॥
श्लो० प्रजानाथंनाथःप्रसभमभिकंस्वांदुहितरं
गतंरोहिद्भूतांरिरमयिषुमृष्यस्यवपुषा ॥
धनुष्पाणेर्यातंदिवमपिसपत्रीकृतममुं
त्रसंतंतेऽद्यापित्यजतिनमृगव्याधरभसः ॥ २२ ॥
शि० स्वकन्या ऐणीचें[1] वपु धरि तिशीं एणवपुला[2] ॥
धरोनी क्रीडावें अशि कुमति जैं होय विधिला[3] ॥

---

१ हरिणीचें. २ हरिणदेहाला. ३ ब्रह्याला.

तयामागें जाशी गगनिँ शरसंधान करुनी ॥
तुझ्या भीतीला तो अजुनिहि बहू वागवि मनीं ॥२२॥
त्रि० लोकत्रासक रावणास सहजें सीता मिळावी असें ॥
आणोनी मनिँ कांचनैणतनुला मारीच तैं घेतसे ॥
त्वां रामें शर मारुनी निशिचरा स्वर्गास त्या धाडिलें ॥
मेल्याही परि साध्वस स्वमनिँ बा त्याच्या गमें राहिलें॥२२॥
श्लो० स्वलावण्याशंसाधृतधनुषमन्हायतृणव
त्पुरःप्लुष्टंदृष्ट्वापुरमथनपुष्पायुधमपि ॥
यदिस्त्रैणंदेवीयमनिरतदेहार्धघटना
दवैतित्वामद्धाबतवरदमुग्धायुवतयः ॥ २३ ॥
शि० स्वरूपाते माझ्या भुलुनि मज अर्धांगिँ धरिलें ॥
असें मानूनीयां तुजहि सतिनें स्त्रैण गणिलें ॥
जरी कामा जाळा तरिहि मनिँ ती हेंचि धरिते ॥
स्वभावें स्त्रीजाती जगिँ खचित भोळीच असते ॥२३॥
त्रि० मी तों थोर पतिव्रता गुणवती रूपान्विता यास्तव ॥
माझेसाठिँच रावणा सेतनुजा मारी रणीं राघव ॥
ऐसें आणुनि मानसीं जनकजा तूतें विरक्ताहि ती ॥
मानी स्त्रैण, खरेंचि भोळसर बा प्रायां स्त्रिया राहती॥२३॥
श्लो० स्मशानेष्वाक्रीडास्मरहरपिशाचाःसहचरा
श्चिताभस्मालेपःस्रगपिनृकरोटीपरिकरः ॥
अमंगल्यंशीलंतवभवतुनामैवमखिलं
तथाऽपिस्मर्तॄणांवरदपरमंमंगलमसि ॥ २४ ॥
शि० पिशाचें सांगातीं, स्मरहर सदा वास मसणीं ॥
कपाळांच्या माळा, अशिच अशुभा सारि करणी ॥

---

१ सुवर्णमृगदेहाला २ पुत्रासहित रावणास ३ वैराग्ययुक्ता (तुला)-
४ (हें संबोधन.)

तथापी जो तूझ्या चरणकमलातें स्मरतसे ॥
तयाच्या मांगल्या त्रिभुवनिँहि बा पारचि नसे ॥२४॥
त्रि० स्मशानें जैसीं कां तशिँच सकलें होति सदनें ॥
सदा दुःखें जेथें विविध अशुभें नित्य रुदनें ॥
अशा गेहांमाजी क्षणिक सुख जें वैषयिक रे ॥
नव्हे तें दैत्यारे सुख परि असे दुःखचि खरें ॥ २४ ॥

पिशाच्यापरी बायका आणि पोरें ॥
हरीती विवेकास नाना प्रकारें ॥
तयाचाचि या मानवालागिँ संग ॥
सदासर्वदा नाहिँ शांतिप्रसंग ॥ १ ॥
मुखीं लाळ नाकांत शेंबूड, पोटीं ॥
वसे मूत्र विष्ठादिकें घाण मोठी ॥
वसा रक्त पू आंतडीं अस्थिमाळा ॥
करोटी शिरीं देहदुर्गंधगोळा ॥ २ ॥
अमंगळ असे असें सकळ मानवाचें जिणें ॥
तथापि शुभ नाम जो तव मनीं मुखीं वा ह्मणे ॥
तरी अशुभ जाउनी निखिल होतसे मंगळ ॥
असें तव शुभप्रदा सहज चिंतनाचें फळ ॥ २४॥

श्लो० मनःप्रत्यक्चित्तेसविधमवधायात्तमरुतः
प्रहृष्यद्रोमाणःप्रमदसलिलोत्संगितदृशः ॥
यदालोक्याल्हादंह्रदइवनिमज्यामृतमये
दधत्यंतस्तत्त्वंकिमपियमिनस्तत्किलभवान् ॥ २५॥

शि० मनःप्राणादींचा करुनि नियमें रोध वसती ॥
जयां ध्याता योगी अनुदिनिँ समाधींत डुलती ॥

---

१ ज्या तत्त्वाला.

मिळे जेणें त्यांहो सतत परमानंद मुनियां ॥
असें जें, तें तत्त्व प्रकट असती तूंचि सदया ॥ २५ ॥
त्रि० मन:प्राणादींचा करुनि नियमें रोध वसती ॥
जया ध्याता योगी अनुदिनिँ समाधींत डुलती ॥
मिळे जेणें त्यांहो सतत परमानंद मुनियां ॥
असें जें, तें तत्त्व प्रकट असती तूंचि सदया ॥ २५॥

श्लो० त्वमर्कस्त्वंसोमस्त्वमसिपवनस्त्वंहुतवह
स्त्वमापस्त्वंव्योमत्वमुधरणिरात्मात्वमितिच ॥
परिछिन्नामेवंत्वयिपरिणताबिभ्रतिगिरं
नविद्मस्तत्तत्त्वंवयमिहतुयत्त्वंनभवसि ॥ २६ ॥

शि० रवी, वायू, पाणी, विधु, गगन, अग्नी, वसुमती[2] ॥
तसा आत्मा, ऐशा अठचि तुझिया मूर्ति गणिती ॥
परी[3] होसी ना जें सकळहि जगीं वस्तु न असें ॥
असा हे विश्वात्म्या सुदृढ अमुचा निश्चय असे॥२६॥
त्रि० रवी, वारा, पाणी, विधु, गगन, अग्नी, वसुमती ॥
तसा आत्मा, ऐशा परिमित तुझ्या मूर्ति गणिती ॥
परी होसी ना जें सकलहि जगीं वस्तु न असें ॥
असा हे विश्वात्म्या सुदृढ अमुचा निश्चय असे॥२६॥

श्लो० त्रयीतिस्त्रोवृत्तीस्त्रिभुवनमथोत्रीनपिसुरा
नकाराद्यैर्वर्णैस्त्रिभिरभिदधत्तीर्णविकृति ॥
तुरीयंतेधामध्वनिभिरवरुंधानमणुभि:
समस्तंव्यस्तंत्वांशरणदगृणात्योमितिपदम् ॥ २७ ॥

---

१ योग्यांतें २ पृथ्वी ३ तू जें होसी ना असें वस्तु जगीं नाहीं, असा अन्वय

शि० श्रुती, वृत्ती, लोकें, त्रिदशें, गुणेंही तीन असती ॥
क्रमें ज्याचे वर्ण स्फुट तिन अकारादि वदती ॥
चतुर्थी धामातें तव पुररिपो सर्व वदतें ॥
समस्तव्यस्तत्वें तुजचि पद ओंकार कथितें ॥ २७ ॥

त्रि० श्रुती, वृत्ती, लोक, त्रिदश, गुणही तीन असती ॥
क्रमें ज्याचे वर्ण स्फुट तिन अकारादि वदती ॥
चतुर्थी धामातें तव मुररिपो सर्व वदतें ॥
समस्तव्यस्तत्वें तुजचि पद ओंकार कथितें ॥ २७ ॥

**श्लो० भवःशर्वोरुद्रःपशुपतिरथोग्रःसहमहां**
**स्तथाभीमेशानावितियदभिधानाष्टकमिदम् ॥**
**अमुष्मिन्प्रत्येकंप्रविचरतिदेवःश्रुतिरपि**
**प्रियायास्मैधाम्नेप्रणिहितनमस्योस्मिभवते ॥ २८ ॥**

शि० तुझीं नामें आठ प्रथित भवशर्वादि असती ॥
तया प्रत्येकाची श्रुतिहि करिते बा बहुनुती ॥
असा आत्मा जो तूं प्रियतम जगातेंहि सकळा ॥
नमस्कारातें मी करिं तव पदालागिं विमळा ॥ २८ ॥

त्रि० तूंपासुनी सर्व जगास उद्भव ॥
ह्मणोनि तूझें अभिधान वा भव ॥
असाच शर्वादिक नामवर्ग रे ॥
कृतीवरोनी तव शोभतो हरे ॥ १ ॥
एकैकनामीं वसती तुझ्या गुण ॥
गातो श्रुतीचा समुदाय आपण ॥
असा प्रभू व्यापक तू जगास हा ॥
तूंतें नमस्कारितसें अता पहा ॥ २८ ॥

---

१ वेद, ऋग्वेदादि, २ जागृदादि अवस्था. ३ भूरादि ४ देव, ब्रह्मादि ५ सत्वादि ६ अ-उ-म्. ७ स्तुति.

श्लो० नमोनेदिष्ठायप्रियदववदविष्ठायचनमो
नमःक्षोदिष्ठायस्मरहरमहिष्ठायचनमः ॥
नमोवर्षिष्ठायत्रिनयनयविष्ठायचनमो
ममःसर्वस्मैतेतदिदमतिसर्वायचनमः ॥ २९ ॥

शि० नमू दूरस्थाला अतिनिकटवासा तुज नमू ॥
नमूं मोठ्यालागीं अतिलघु अशाला तुज नमू ॥
नमू बालालाही अणिक अतिवृद्धा तुज नमू ॥
नमूं विश्वात्म्याला अणि जगदतीता तुज नमू॥२९॥

वि० नमूं दूरस्थाला अतिनिकटवासा तुज नमू ॥
नमू मोठ्यालागीं अतिलघु अशाला तुज नमू ॥
नमू बालालाही अणिक अतिवृद्धा तुज नमू ॥
नमूं विश्वात्म्याला अणि जगदतीता तुज नमू॥२९॥

श्लो० बहलरजसेविश्वोत्पत्तौभवायनमोनमः
प्रबलतमसेतत्संहारेहरायनमोनमः ॥
जनसुखकृतेसत्त्वोद्रिक्तौमृडायनमोनमः
प्रमहसिपदेनिस्त्रैगुण्येशिवायनमोनमः ॥ ३० ॥

शि० रचि जग रजोयोगें ऐशा भवास नमू अही ॥
अतिशयतमे तत्सहर्त्या हरास नमू अही ॥
जनसुख करी सत्वें त्या हो मृडास नमू अही ॥
त्रिगुणरहिता तेजोधामा वरास नमू अही ॥३० ॥

वि० रचि जग रजोयोगें ऐशा भवास नमू अही ॥
अतिशयतमें तत्सहर्त्या हरास नमू अही ॥
जनसुख करी सत्वें त्या हो मृडास नमू अही ॥
त्रिगुणरहिता तेजोधामा वरास नमू अही ॥ ३० ॥

---

1 जगत्सहर्त्या.

श्लो० कृशपरिणतिचेतःक्लेशवश्यंक्वचेदं
क्वचतवगुणसीमोल्लंघिनीशश्वदृद्धिः ॥
इतिचकितममंदीकृत्यमांभक्तिराधा
द्वरदचरणयोस्तेवाक्यपुष्पोपहारम् ॥ ३१ ॥
शि० अतिशयविपदांनीं व्यग्र मच्चित्त कोठें ॥
अणि तव महिमा वा वर्णनातीत कोठें ॥
परि मजकडुनी त्वद्भक्ति पादीं तुझ्या जी ॥
स्तवनवचनरूपा वाहवी पुष्पराजी ॥ ३१ ॥
त्रि० अतिशयविपदांनीं व्यग्र मच्चित्त कोठें ॥
अणि तव महिमा वा वर्णनातीत कोठें ॥
परि मजकडुनी त्वद्भक्ति पादीं तुझ्या जी ॥
स्तवनवचनरूपा वाहवी पुष्पराजी ॥ ३१ ॥
श्लो० असितगिरिसमंस्यात्कज्जलंसिंधुपात्रे
सुरतरुवरशाखालेखनीपत्रमुर्वी ॥
लिखतियदिगृहीत्वाशारदासार्वकालं
तदपितवगुणानामीशपारंनयाति ॥ ३२ ॥
शि० निरवधि उदधी तो शाइचें होय पात्र ॥
अमरतरूचि देखा लेखणी भूमिपत्र ॥
गणिल तव गुणांतें सर्वदा शारदाही ॥
तरिहि गणित त्यांचें पूर्ण होणार नाहीं ॥ ३२ ॥
त्रि० निरवधि उदधी तो शाइचें होय पात्र ॥
अमरविटपिशाखा लेखणी भूमिपत्र ॥

---

१ (हें कर्तृपद) २ स्तवनसबंधी वाक्यरूप ३ पुष्पांचा समुदाय (हें कर्मपद ) त्वद्भक्ति— मजकडून स्तवनरूप पुष्पें तुझ्या पायीं वाहवी असा अन्वय. ४ कल्पवृक्ष हीच लेखणी ५ पृथ्वी हाच कागद. ६ सरस्वती

गणिल तव गुणातें सर्वदा शारदाही ॥
तरिहि गणित त्याचें पूर्ण होणार नाहीं ॥ ३२ ॥

श्लो० असुरसुरमुनींद्रैरर्चितस्येंदुमौले
ग्रंथितगुणमहिम्नोनिर्गुणस्येश्वरस्य ॥
सकलगुणवरिष्ठःपुष्पदंताभिधानो
रुचिरमलघुवृत्तैःस्तोत्रमेतच्चकार ॥ ३३ ॥

शि० असुरसुरमुनी हे वंदिती पाय ज्याचे ॥
त्रिभुवनपति ऐसा इंदुमौली तयाचें ॥
विदित जगतिँ जो कां पुष्पदंताभिधानें ॥
रुचिर अलघुवृत्तीं स्तोत्र केलें तयानें ॥ ३३ ॥

वि० असुरसुरमुनी हे वंदिती पाय ज्याचे ॥
त्रिभुवनपति ऐसा चक्रपाणी तयाचें ॥
विदित जगतिँ जो कां पुष्पदंताभिधानें ॥
रुचिर अलघुवृत्तीं स्तोत्र केलें तयानें ॥ ३३ ॥

श्लो० अहरहरनवद्यंधूर्जटेःस्तोत्रमेतत्
पठतिपरमभक्त्याशुद्धचित्तःपुमान्यः ॥
सभवतिशिवलोकेरुद्रतुल्यस्तथाऽत्र
प्रचुरतरधनायु.पुत्रवान्कीर्तिमांश्च ॥ ३४ ॥

शि० स्तुति अमल अशी जो ही प्रसिद्धा शिवाची ॥
मनुज विमलचित्तें भक्तिनें नित्य वाची ॥
शिवसमवपु अंतीं रुद्रलोकीं निवास ॥
इथहि धनसुतादि प्राप्त होईल त्यास ॥ ३४ ॥

वि० स्तुति अमल अशी हे जो स्वयें केशवाची ॥
मनुज विमलचित्तें भक्तिनें नित्य वाची ॥
हरिसमवपु अंतीं विष्णुलोकीं निवास ॥
इथहि धनसुतादि प्राप्त होईल त्यास ॥ ३४ ॥

यापुढले साहा श्लोकांचा मधुसूदनाचार्य यांनीं विष्णु-पर अर्थ त्याचे टीकेंत केला नाहीं, याजकरितां एकले शिवपर श्लोक चालू करून हें स्तोत्र संपूर्ण केलें.

श्लो० महेशान्नापरोदेवो महिम्नोनापरास्तुतिः ॥
अघोरान्नापरोमंत्रोनास्तितत्त्वंगुरोःपरम् ॥ ३५॥

शि० देवामधें देव महेश एक ॥
स्तोत्रामधें स्तोत्र महिम्न देख ॥
मन्त्रामधे मन्त्र अघोर आहे ॥
गुरूहुनी तत्त्व न अन्य पाहे ॥ ३५ ॥

श्लो० दीक्षादानंतपस्तीर्थं ज्ञानंयागादिकाःक्रियाः ॥
महिम्नस्तवपाठस्य कलांनार्हंतिषोडशीम् ॥ ३६ ॥

शि० दीक्षादानतपें अनेक यजनें देवांस उद्देशुनी ॥
आत्मज्ञान सुतीर्थ वर्गगमनें ऐशा बहू साधनीं ॥
होतें पुण्य अगाध त्यास तुलितां या स्तोत्रपाठोद्भवा ॥
पुण्याशीं तरि षोडशांशसमही तें होइना मानवा ॥३६॥

श्लो० कुसुमदशननामासर्वगंधर्वराजः
शशिधरवरमौलेर्देवदेवस्यदासः ॥
सगुरुनिजमहिम्नोभ्रष्टएवास्यरोषात्
स्तवनमिदमकार्षीद्दिव्यदिव्यंमहिम्नः ॥ ३७ ॥

शि० गंधर्वराज बहुविश्रुत पुष्पदंत ॥
होता शिवानुचर अद्भुतशक्तिमंत ॥
तो नष्टशक्ति निजदुष्टकृतीमुळें कीं ॥
झाला शिवावगणना घडुनी त्रिलोकीं ॥ १ ॥

---

१ देवतोद्देशानें अनेक याग असा अन्वय. २ तीर्थयात्रा. ३ हे मानवा असें संबोधन

तेणें स्मरोनि गिरिशांघ्रियुगास नव्य ॥
केला तदीयमहिमस्तव फार दिव्य ॥
झाला प्रसन्न बहु शंकर या स्तवानें ॥
दे शक्ति त्यास विपुला पहिल्याप्रमाणें ॥ ३७ ॥

श्लो० सुरवरमुनिपूज्यंस्वर्गमोक्षैकहेतुं
पठतियदिमनुष्यःप्रांजलिर्नान्यचेताः ॥
व्रजतिशिवसमीपंकिन्नरैःस्तूयमानः
स्तवनमिदममोघंपुष्पदंतप्रणीतम् ॥ ३८ ॥

शि० सुरासुरमुनींसही परमपूज्य हें स्तोत्र रे ॥
समर्थ बहु द्यावया जगतिं भुक्ति मुक्ती त्वरें ॥
करी पठन जो नरप्रवर एकचित्तें यथा ॥
घडे सुखनिवास हो गिरिशसन्निधानीं तथा ॥ ३८ ॥

श्लो० श्रीपुष्पदंतमुखपंकजनिर्गतेन
स्तोत्रेणकिल्बिषहरेणहरप्रियेण ॥
कंठस्थितेनपठितेनसमाहितेन
सुप्रीणितोभवतिभूतपतिर्महेशः ॥ ३९ ॥

शि० श्रीपुष्पदंतकृत हें भुवनप्रसिद्ध ॥
पापास हारुनि करी सकलार्थ सिद्ध ॥
शंभुप्रियस्तवन यत्पठन उमेश ॥
होतो प्रसन्न बहु भूतपती महेश ॥ ३९ ॥

श्लो० इत्येषावाङ्मयीपूजाशिवशंकरपादयोः ॥
अर्पितातेनमांदेवःप्रीयतांचसदाशिव ॥ ४० ॥

शि० अशी ही वाङ्मयी पूजा । शिवांघ्रिवरि अर्पिली ॥
हीनें संतुष्ट होत्साता । शिव प्रीति करो भली ॥ ४० ॥

---

१ नवीन २ नरश्रेष्ठ.

इति श्रीपुष्पदंतविरचितमहिम्नस्तोत्र व त्याचें, गणेश शास्त्री लेले त्र्यंबककरकृत प्राकृतपद्यात्मक भाषांतर समाप्त.

### " समाप्तीचा श्लोक."

ज्याचा तात असे सदाशिव सुधी माता सती पार्वती ॥
गांव त्र्यंबक हें गणेश अभिधा लेले उपाख्याहिती ॥
त्यानें प्राकृतभाषणीं उतरली दिव्या महिम्नस्तुती ॥
दोषा टाकुनियां हिच्या गुणलवा घेवोत ते जे कृती ॥ १ ॥

### " आर्या."

सतराशें सत्याण्णव शककालीं चैत्रशुद्धनवमीला ॥
गेला श्रीशदयेनें निर्विघ्न ग्रंथ हा समाप्तीला ॥ १ ॥

समाप्त.

# सीतास्वयंवर

( गद्यरूप व पद्यरूप. )

---

रघुनाथ कथा बहु नेटकि जे ।
भजकां सुखदायक पाठ किजे ॥
रमवृद्धि समृद्धि धनासि करी ।
अनुपम्य सुधा रविची लहरी ॥ १ ॥

विठ्ठल कवि—

महादेव गुर्जर बुकसेलर आणि पब्लिशर
रामवाडी
मुंबई.

मुंबई.

कर्नाटक छा० छा०

---

[ सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यांनें स्वाधीन ठेविले आहेत ]

सन १८८८.

किंमत ३॥ आणे.

# प्राकृतपुस्तकें.

## मनुस्मृति प्राकृत भाषान्तरसहित.

मनुस्मृति धर्मशास्त्राचा, प्रत्येक व्यवहारि मनुष्यास उपयोग आहे कुल्लूकभट्टकृत टीकेच्या आधारानें हें भाषान्तर केलेलें आहे. सुंदर टाइपानीं, चांगल्या कागदांवर, रायल अष्टपत्री साच्यानें छापलेलें व जाड पुठ्यानें व कापडानें बांधलेलें बुक कि. रु. ६ ट. ६ आणे.

---

## याज्ञवल्क्यस्मृति व्यवहाराध्याय प्राकृत-भाषान्तरसहित.

मूलश्लोक, मिताक्षराटीका आणि दोहोंचीं निरनिराळीं भाषान्तरें, उत्तम टाइपानें, जाड कागदांवर, रायल अष्टपत्री सांच्यानें छापलेलें व जाड पुठ्यानें बांधलेलें बुक. कि. रु. ६ ट. ६ आणे.

ह्या दोन्ही पुस्तकांच्या प्रति अगदींच थोड्या राहिल्या आहेत लायब्ररीकरितां दोन्ही प्रति एकदम मागविल्यास रु. १० पडतील.

---

## सार्थ सत्यनारायणकथापूजासहित.

उत्तमटाईपानीं सुशोभित छापलेली पोथी कि. ६ आ० ट. १ आ०

---

## बाणकादंबरी. ( महाराष्ट्र भाषेंत. )

| | कि० आ० | ट० |
|---|---|---|
| भाग पहिला गोडबोलेकृत ...... . . . . . | ११॥ | १॥ |
| भाग दुसरा गुर्जरकृत . . . . . | १४ | १ |

दोन्ही भाग एकदम मागविणारास टपालखर्च पडणार नाहीं

---

## उदार दामोदर नाटक.

दक्षिणाप्राईज् कमिटीनें पसत करून बक्षीस दिलेलें ह्यांत, मगळवेढें येथील भक्त दामाजीपंत यांचें चरित्र वर्णन केलें आहे याचीं प्र० द्वादशपत्री पृष्ठें २५० आहेत कि० रु० १। टपालखर्च पडणार नाहीं

# सीतास्वयंवर.

नवीन गद्यरूप

(मोरोपंती आर्या, आणि विठ्ठलकविकृत
सीतास्वयंवर यांचे यांसह.)

हें

दत्तात्रेय कृष्ण सांडू

ह्यांनीं लिहिलें

तें

जनार्दन महादेव गुर्जर,

ह्यानीं

कर्नाटक छा० छा० प्रसिद्ध केलें.

मुंबई.

सन १८८८,

किंमत ३॥ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ९५
ठाणें

# विज्ञापना.

वाणी पवित्र रघुनाथचरित्र गातां ।
तें आयका पतित पावन होय आतां ॥
हे पंडितांस विनती करणें न लागे ।
ध्याहो सुगंध मधुपाप्रति कोण सांगे ॥ १ ॥

सीतास्वयंवर हें कथानक सर्वांस विदित आहेच हें केवळ वाल्मीकिरामायणांतील कथानकावरून लिहिलें नसून शेवटीं दिलेल्या पद्यरूप स्वयंवराच्या दुसऱ्या श्लोकाप्रमाणें आहे. अर्थात् अठरा धान्याच्या कोडबोळ्याप्रमाणें, तरी तें साधार आहे. तिखटामिठाचा स्नेहयुक्त पदार्थ फार मिष्ट लागतो. ह्याची भटी कितपत साधली व उतरली व तें लोकांस किती प्रिय होईल हें चिंतन करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. कारण मूळेंच कथानकच सर्वांस पूज्य व प्रिय आहे. मात्र यांत कमज्यास्तपणा ह्मणून जो काय तो, अशा प्रकारचाच आहे.

गीर्वाण हें शशिमंडळ अद्भुत ।
त्याची प्रभा हें प्राकृत ॥

शेवटीं पद्यरूप स्वयंवराचे वेंचे दिले आहेत ते दुसरी प्रत कोठें आढळली नाहीं ह्मणून यथाप्रत दिले आहेत. ते देण्याचा हेतु, केवळ दोनशें वर्षांपूर्वींचे जे महाराष्ट्रक, त्याचा मासला कळावा हाच आहे. यांत अगदीं निरु-

पायास्तव फेरफार केला आहे तो, कविकृतींत फरक केल्याचा दोष व अर्थास बाध न होई असा केला आहे.

ज्या दत्तकृपेनें आजपर्यंत चांगले दिवस गेले त्यास हा लेख अर्पण करून त्याची प्रार्थना करितों.

---

# मोरोपंती सीतास्वयंवरसार.

## आर्या.

जनक पुरा मग जाउनि, भंगुनि भवचाप दंड बाळपणीं ॥
कौशिक मुनि प्रसादें, जिंकी रघुवीर जानकीस पणीं ॥१॥
प्रतचित्तें त्या जनकें, धाडुनि शिबिका रथेभवाहातें ॥
दशरथ पूर्णमनोरथ, सांत.पुर आणिला विवाहातें ॥ २ ॥
जनपदजनबहु तेव्हां, मिळते झाले कविप्रभूपयमी ॥
गंधर्व यक्ष चारण, किन्नर सुरलोक विप्र भूप यमी ॥ ३ ॥
प्रज्वा जनक स्वौरस, कन्या जे उर्मिला तिचा पाणी ॥
लक्ष्मण वीरा करवीं, धरवी तें लोक फार वाखाणी ॥ ४ ॥
राजाचा अनु जन्मा, कुशध्वजाख्य प्रसिद्ध तो कन्या ॥
श्रुतकीर्ति रिपुघ्नाला, दे भरतालाहि मांडवी धन्या ॥ ५ ॥
महदुत्सवें विवाहीं, अर्पी नृप जावयांसि नग-राशी ॥
पुजुनि पंक्तिरथातें, आज्ञा दे जावयासि नगराशी ॥ ६ ॥

---

# सीतास्वयंवर.

पूर्वी पद्माक्षराजानें लक्ष्मीस प्रसन्न करून वरदान मागितलें कीं, तूं माझी कन्या होऊन माझ्या मांडीवर बसावें. तेव्हां लक्ष्मी ह्मणाली, राजा, मी जर तुझ्या घरीं आलें तर, नसतीं विघ्नें तुझ्या पाठीस लागतील. ह्मणून, हा तुझा हेतु चांगला नव्हे. राजा ह्मणाला. तें कसेंही असो, मला सर्व मान्य आहे, तूं माझी कन्या हो. असा आग्रह पाहून लक्ष्मी ह्मणाली, सर्व खरें, पण मी सर्वस्वी स्वामीच्या आधीन आहें, मी स्वतंत्र नाहीं. तेव्हा राजानें परमात्म्यास प्रसन्न करून, लक्ष्मी कन्या व्हावी, हाच वर मागितला. श्रीविष्णूनीं हास्य करून त्यास एक मातुलिंगफल (मावळग) दिलें. राजानें तें आपल्या मंदिरांत आणून ठेविलें, नऊ महिने होतांच त्यांतून अतिलावण्य असें कन्यारत्न निघालें. पुढें ती कन्या उपवर झाली; तेव्हां राजे, ऋषि, गंधर्व, यक्ष, चारण, विद्याधर, इत्यादि सर्व एकत्र होऊन त्या पद्माक्षराजाकडे आले आणि ह्मणूं लागले कीं, कोणता तरी एक पण कर, ह्मणजे त्या प्रमाणें जो, तो पण सिद्धीस नेईल त्यास ही कन्या द्यावी. पद्माक्षास फार राग येऊन, तो ह्मणाला, ज्याची अंगकांति आकाशाप्रमाणें नीलवर्ण असेल त्यास

ही देणार. असें ऐकताच सर्वांस राग आला. त्यानीं पद्माक्षाबरोबर सात दिवस युद्ध करून त्यास ठार मारिलें. तेव्हा ती पद्माक्षाची मुलगी, अग्निकुंडात गुप्त झाली. त्यामुळें सर्व निराश होऊन परत गेले.

ती पद्माक्षजा—ब्रह्मारण्य ह्मणजे प्रयाग, याच्या सुमाराम—अग्निकुंडांतून बाहेर येत असतां विमानस्थ रावणानें तिजवर झांप घातली. तों ती पुन्हा त्या कुंडात गुप्त झाली. तिच्या शोधार्थ, रावण, तें कुंड विझवून खणूं लागला तेव्हा त्यास पांच रत्नें सांपडलीं. तीं त्यानें एका पेटींत घालून आपल्या मंदिरांत आणून ठेविलीं. एकांतसमयीं त्यानें आपल्या पट्टराणीमंदोदरीस सांगितलें कीं, तुझ्याकरितां अमूल्य अशी रत्नें आणून ह्या पेटींत ठेविलीं आहेत, तीं पहा. मंदोदरी धावत जाऊन ती पेटी उचलूं लागली, तों तिला ती नुसती हालेना देखील असें पाहून रावण मोठ्यानें हासला आणि त्या पेटीजवळ जाऊन ती उचलूं लागला, त्यासही ती उचलेना. पुढें मंदोदरीनें ती पेटी उघडली, तों आंत सहामहिन्याची मुलगी तिच्या दृष्टीस पडली तीस पाहून ती ज्ञानसंपन्न महामती मंदोदरी ह्मणाली, हें विघ्न कशाला घरीं आणिलेंत ही, मायातीत जो चैतन्यदेही घनश्याम त्या शिवाय दुसऱ्या कोणासही वरणार नाहीं. त्यावाचून ही इतरांस

अग्निज्वालेसारखी आहे. हिनेंच पद्माक्ष राजास मारिलें. ह्मणून पहिल्यानें हिला नगरा बाहेर नेऊन सोडून द्या.

असें ऐकून रावणानें सेवकांस सांगितलें कीं, ही पेटी जनकराजाच्या मिथिलानगरींत नेऊन पुरून टाका. सेवकांनीं रावणाच्या आज्ञेप्रमाणें त्या पेटीची व्यवस्था केली.

ज्या ठिकाणीं ती पेटी पुरली तें शेत, जनकराजानें एका वेदशास्त्रसंपन्नब्राह्मणास दान दिलें होतें. तो ब्राह्मण तें शेत नांगरीत असतां त्यास ती पेटी सांपडली. निधिनिक्षेपाचा धनी राजा आहे, असें समजून त्या ब्राह्मणानें ती पेटी जनकराजास नेऊन दिली. जनकानें ती उघडून पाहिली तों, आंत, पांच वर्षांचें असें देदीप्यमान कन्यारत्न त्याच्या दृष्टीस पडलें. जनकास मोठें आश्चर्य वाटून त्याचें त्यावर प्रेमही उत्पन्न झालें. सीता नांवाच्या नांगराच्या तासापासून ती प्राप्त झाल्यामुळें तिचें नांव **सीता** असें ठेविलें.

याप्रमाणें ती जनकात्मजासीता, जनकाच्या राजवाड्यांत, बाल्यावस्थेंतील नानाविधक्रीडा करीत असतां, एके दिवशीं, रेणुकेचा सूड उगविण्याकरितां ज्यानें पृथ्वी एकवीस वेळां निःक्षत्रिय केली तो परशुराम, सहस्रार्जुनास मारून विश्रांतीकरितां जनकाकडे आला. जनकानें त्याची प्रेमपुरःसर पूजा केली. भोजनोत्तर परशुराम

बाहेर येऊन पाहतो, तों आपण ठेविलेलें शिवकोदंड कोठें दिसलें नाहीं. तेव्हां त्यास फार आश्चर्य वाटून रागही आला. तो ह्मणाला, हत्तीनांही उचलणारें नाहीं असें धनुष्य कोणत्या मनुष्यानें नेलें कळत नाहीं. हें मोठें आश्चर्य आहे. जनक व परशुराम अंगणांत येऊन पाहतात तों, सीता त्या धनुष्याचा घोडा करून त्यावर बसून झ्या झ्यां करीत खेळत आहे, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. परशुरामानें धांवत जाऊन मोठ्या प्रेमानें तिला आलिंगन दिलें. सीता लज्जित होऊन तेथेंच तें धनुष्य टाकून पळून गेली. तें धनुष्य मोठमोठ्या वीरांसही तेथून हालेना. परशुरामानें जनकास सांगितलें कीं "माझें अवतारकृत्य सर्व समाप्त झालें, आतां हें शिवकोदंड येथेंच ठेवितों. जो हें धनुष्य सज्ज करील तोच सीतेचा पति असा पण करून, जो, तो पण सिद्धीस नेईल त्यासच ही अर्पण करावी," असें सांगून तो निघून गेला.

पुढें सीता, उपवर झाली तेव्हां, जनकानें देशोदेशींच्या राजास व ऋषींस स्वयंवराकरितां आमंत्रण केलें. त्यावरून हजारों राजे आपापल्या सैन्यासह मिथिलानगरींत येऊन स्वयंवरदिवसाची वाट पहात बसले होते. अयोध्याधिपति दशरथराजालाही आमंत्रण केलें होतें; परंतु विश्वामित्रानें रामलक्ष्मणांस नेलें त्या वियोगदुःखामुळें तो त्यावेळीं आला नाहीं.

सर्व ऋषि व रामलक्ष्मण यांसह विश्वामित्र जनका-
कडे येण्यास निघाला ; तो मिथिलानगरींत प्राप्त झाला.
विश्वामित्राची स्वारी आली असें त्या श्रेष्ठजनकराजानें
ऐकिलें, तेव्हां, शतानंद नामक उपाध्याय व ऋत्विज यांस
अग्रभागीं करून व मोठ्या नम्रतेनें पूजा सामग्री घेऊन
तो जनकराजा विश्वामित्रास सामोरा आला. त्यानें यथा-
विधि विश्वामित्राची पूजा केली. नंतर विश्वामित्रानें,
उपाध्यायास राजाचें कुशल व यज्ञाची निर्विघ्नता विचारिली.

नंतर हात जोडून जनकराजा विश्वामित्राशीं बोलूं
लागला. हे ज्ञानसंपन्न मुने, आपण ह्या मुनिश्रेष्ठासह आ-
सनावर बसावें. हें ऐकून तो विश्वामित्र आसनावर बसला,
तेव्हां पुरोहित, ऋत्विज, तसेंच मंत्रिजन, राजा हे आपा-
पल्या अधिकाराप्रमाणें विश्वामित्राच्या सभोंवतीं बसले. ज
नकराजा मोठ्या उत्साहानें विश्वामित्राशीं पुनः बोलूं
लागला. हे ब्रह्मन्, तपोरूपभाग्यानें युक्त अशा आपल्या
दर्शनानें मला यज्ञफल प्राप्त झालें. आपण मुनीसह प्राप्त
झालां हा मजवर मोठा अनुग्रहच केलात. या मुळें मी धन्य
झालों. हे मुने, आपणाजवळ देवांसारखे पराक्रमी, हत्ती-
प्रमाणें ज्याची मंदगति, सिंह व्याघ्रासारखे क्रूर, रूपानें अ-
श्विनीकुमारांसारखे, तसेंच उत्तम तारुण्य प्राप्त झालेले, हे
स्वेच्छेनें स्वर्गाहून आलेले देवच काय ! असे हे कुमार अ-

सतां अश्वादिकवाहनांवांचून कमलपत्रासारख्या कोमल पायांनाच इतके दूर कसे आले ? हे मुनिश्रेष्ठा, आयुधें धारणकरणारे, अर्थात् वीर; हे पुत्र कोणाचे आहेत ? हे महामुने, चंद्र सूर्य जसे आकाशास भूषित करतात तसे हे या प्रदेशास अलंकृत करीत आहेत. यांच्या शरीराकृतीचें व इतर क्रियेचें साम्य या परस्परांवाचून इतराशीं व्हावयाचें नाहीं. ह्यांच्या रूपावरून कोटिमदन ओंवाळून टाकावे, ह्यांस पाहून माझें मन अगदीं प्रसन्न व उल्हासित झालें आहें. असे हे कोण आहेत ? तें ऐकण्याविषयीं मी फार उत्सुक झालेला आहें. तर मजवर—कथनरूप—अनुग्रह व्हावा.

विश्वामित्र—हे विशालबुद्धेजनकराजा, हे दशरथाचे पुत्र रामलक्ष्मण आहेत यानीं सिद्धाश्रमात राहून, राक्षसांनीं व्याप्त अशा भयंकर अरण्यातील मार्गानें प्रवेश करून मोठमोठ्या राक्षसास मारिलें व चालता चालता चरणधूलीनें, मार्गांतील शिला रूपब्रह्मकन्या अहिल्येस—उद्धरिली. यांनीं त्राटिकाराक्षसी मारून माझा यज्ञ सिद्धीस नेला. सुबाहूसह वीसकोटि राक्षस मारिले. हे क्षत्रियवीर, शिवकोदंड पाहण्याकरितां मुद्दाम येथें आले आहेत. राजा, हे साक्षात् शेषनारायण अप्रयासानें, न बोलवितां, तुझ्या घरास चालून आले आहेत, ह्मणून तूंच एक खरा

भाग्यवान् आहेस. क्षुधितापुढें जसा क्षीरसागर यावा तसे हे तुझ्याजवळ आले आहेत. बरोबरच आहे; राजा, हें भाग्योदयाचें लक्षणच आहे कीं, घरच्या दासीही ऋद्धिसिद्धि होतात, दारांतील वृक्षही कल्पिलेलें फल देतात. हातांतील मृत्तिका सुवर्ण होतें, खडण गाईही दूध देऊं लागतात, शत्रु मित्र होतात, बुद्धि विकास पावते सर्व राजे वश होतात, समयसूचकता प्राप्त होते. पदोपदीं यश मिळून दिगंतरीं कीर्ति होते. जनका, हा दुष्टगर्व परिहार करणारा शंकरप्रियराम तुझ्या घरीं चालून आला ह्मणून तू आज धन्य आहेस. राजा. तें धनुष्य ह्यास दाखीव ह्मणजे हे राजपुत्र पूर्णमनोरथ होऊन यथेष्ट परत जातील.

असें ऐकून जनकराजानें जवळ असणाऱ्या प्रधानास आज्ञा केली कीं, गंधपुष्पानीं पूजित तें दिव्यधनुष्य सभेच्या संन्निध आणावें. राजाज्ञा होतांच त्या प्रधानानीं, मोठे भव्य व पुष्ट अशा पाचहजार मनुष्यांकरवीं तें धनुष्य, ज्या पेटींत होतें ती पेटी, सांगितल्यास्थलीं आणून ठेविली आणि ते राजाजवळ येऊन ह्मणाले. महाराज-सर्व राजास पूज्य असें तें श्रेष्ठधनुष्य सभेच्या संन्निध आणिलें आहे. इच्छेप्रमाणें जमलेल्या सर्व राजांस व रामचंद्रास दाखवावें.

नतर जनकानें, मोठ्या आदरसत्कारानें, विश्वामित्रासह रामलक्ष्मणांस सभेंत आणून बसविलें. रामास पाहून सर्व राजे आश्चर्यभरित झाले. ते मनात ह्मणू लागले कीं, सीता ह्यासच द्यावी. हाच वर तिला योग्य आहे. परंतु हा सकुमार असल्यामुळें शिवकोदंड सज्ज करण्याचा पण कसा सिद्धीस नेईल जनकराजाही मनांत ह्मणू लागला कीं, राम माझा जांवई होईल तर माझ्या भाग्यास पारावारच नाहीं; परंतु पण मोठा दुर्घट आहे.

इतक्यात, एका तरुण हत्तिणीवरील रत्नजडित अंबारींत बसून, कोणी श्वेत चामरें ढाळीत आहेत, कोणी क्षणोक्षणीं भूषणें नीट करीत आहेत; कोणी तांबूल देत आहेत, अशा सख्यासहवर्तमान निरुपमेय तेजस्वी अशी दिव्यमाळ हातात घेऊन सर्व राजे ऋषिसमुदाय यास पहात पहात सीता आली.

जिचें सुवर्णासारखें दिव्यांग, जिचे नीलकमलाप्रमाणें आकर्णविकसित असे नेत्र, जिचें चंद्रासारखें मुख, बोलताना, कुंदकलिसारख्या जिच्या सुरेख दंतपंक्ति रत्नाप्रमाणें झळकताहेत, जिचा मध्यभाग फार सूक्ष्म आहे, जिचे पादतल आरक्त आहेत, जिचे पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें अधरोष्ठ, वसंतऋतूतील मत्त कोकिळेप्रमाणें जिचा शब्द फार मधुर आहे, जिच्या तोंडात तांबुल आहे, जिनें नेत्रामध्यें

काजळ रेखिलें आहे, ललाटावर कस्तूरीचा तिलक शोभत आहे, गळ्यांत मोत्यांचा हार विलसत आहे, कमरेमध्यें कांची झळकत आहे, हृदयावर मंदारपुष्पांचा हार विराजत आहे, कानांतील कुंडलांचा नाद वीणेप्रमाणें मधुर होत आहे. बालार्काप्रमाणें रत्नजडित कनकभूषणें झळकत आहेत. विद्युल्लतेप्रमाणें पीतांबर लखलखत आहे.

अशी सीता सर्व सभा विलोकित असतां घनश्याम रामचंद्र तिच्या दृष्टीस पडला. तेव्हां सीता, विजया सखीजवळ हळूच बोलूं लागली, सखे, त्या ऋषिमंडळांत जी सावळी मूर्ति दिसत आहे तिजवर माझी प्रीति जडत आहे. त्या घन श्याम सुंदराचें रूप पाहून कामाचीही मुरकुंडी होईल. सखे विजये, असा वर जर मला प्राप्त होईल तर, संसारींच काय पण त्रिभुवनांत मी धन्य होईन. मी जर पुष्कळजन्मपर्यंत तप केलें असेल तरच हें निधान मला प्राप्त होईल. सखे, आतां नवस तरी कोणास करूं? कोणतें दैवत मला पावेल? गडे, सर्वांत रूपानें व गुणानें श्रेष्ठ अशा ह्या राजीवनेत्रास मी स्वत माळ घालीन तर तो सोहळा अवर्णनीय होईल.

इतक्यांत विश्वामित्र जनकास ह्मणाला. शिवकोदंड लवकर आणावें. येथें मोठमोठे पुरुषार्थी राजे आले आहेत. असें सांगतांच ती पेटी आणवून, जनक राजा. हात जोडून विश्वा

मित्रास ह्मणाला, हे ब्रह्मन्, ईश्वरसंबंधीं धनुष्य देवासारखें पूजिलें आहे आणि ह्या धनुष्यावर गुण चढविण्याविषयीं सर्व सुरांसह देवगण, तसेच राक्षस, गंधर्व व यक्ष यांतील श्रेष्ठ, त्याच प्रमाणें किन्नरांसह मोठे नाग, हे समर्थ झाले नाहींत असा ह्या धनुष्याचें आकर्णपर्यंत आकर्षण करणें, तें वांकविणें, आणि त्यावर बाणाची योजना अथवा तत्संबंधीं रज्जुठणत्कार तसेंच तें तोलून पाहणें, हे व्यापार करण्याविषयीं मनुष्य कसा समर्थ होईल? तथापि, हे मुनिश्रेष्ठा, मी पण केला आहे ह्मणून, अनुज्ञेप्रमाणें हें येथें आणिलें आहे.

तें प्रचंड धनुष्य पाहून सर्व राजे मनांत दचकून गेले. हें कोणास उचलावयाचें नाहीं. हें उचलणारा राजा येथें एकही दिसत नाहीं, असें कित्येक ह्मणू लागले. कित्येकास कंप सुटला, कित्येकांचा गर्व नाहींसा झाला. कित्येक ह्मणूं लागले कीं, केवळ कौतुक पाहण्याकरिता आह्मी येथें आलों. कित्येक ह्मणू लागले, जनकाचा व आमचा स्नेह असल्यामुळें त्यांस भेटण्या करिता आलों.

नंतर जनकानें सर्वांस मोठ्यानें सांगितले कीं, हें धनुष्य उचलून जो सज्ज करील त्यास ही सीता माळ घालणार.

अशी दुर्घटवाणी ऐकून सर्व राजे तटस्थ बसले. कोणीच प्रत्युत्तर देईना. इतक्यांत आगंतुक,—प्रधानासह,



रावण धावत आला, त्यामुळें सर्व सभा गजबजून गेली. सर्वांस वाटलें कीं, हें मोठें विघ्न आलें, आता येथें दुसरी गति दिसत नाहीं हा दांडगा बळेंच ही नवरी उचलून नेईल. हें धनुष्य,उचलल्यास क्षणभर तरी हाच उचलील.

रावण जनकास ह्मणाला, अरे हा तू धनुष्याचा पण केला आहेस, तर एका क्षणांत ह्या धनुष्याचे तुकडे तुकडे करून टाकीन. मी प्रचंडकैलासपर्वत हालविला आहे. सर्व देव बंदिखान्यात घातले आहेत. युद्धांत ऐरावतासह इंद्राला उलथून टाकिला आहे. अशा ह्या प्रतापशूर रावणास, धनुष्य सज्ज करण्यास वेळ लागेल काय? मी मेरू-पर्वत उपटून चेंडूसारखा खेळवीन. ही पृथिवी उचलून समुद्रात टाकण्याचें मला सामर्थ्य आहे. अगस्तीप्रमाणें एका क्षणात समुद्र शोषून टाकीन. आतां हीच प्रतिज्ञा करितों कीं, एका निमिषात हें धनुष्य मोडून सर्व राजा-समक्ष जनकाचा जावई होतों.

असें बोलून वस्त्रें भूषणें सावरून रावण धनुष्याकडे जाऊ लागला. तेव्हा सीता मनात गडबडून गेली. ती चिंताक्रांत होऊन प्रार्थना करूं लागली कीं, हे अपर्णापते, हे त्रिपुरांतका, हें तुझें धनुष्य या मेल्या रावणास उचलू नये असें कर. या दुष्टाचें तोंड लवकर काळें होऊं दे. जितकीं महाप्रचंड दैवतें असतील तितकीं सर्व ह्या धनु-

ष्यावर स्थापन कर. हे जगज्जननि अंबिके ह्या मेल्याची शक्ति लवकर हरण कर.

रावण, धनुष्य उचलू लागला तों—सर्व देवतांच्या भारा मुळेंच काय—त्यास तें प्रथम किंचितही हाललें नाहीं. नंतर दात ओंठ चावून, मोठ्या आवेशानें, वीस हातांनीं तें धनुष्य उचलण्यास रावण वारवार प्रयत्न करीत असतां, सरासरी तें उरापर्यंत उचललें मात्र, तों तें उरावर पडून तो धाड-कन उताणा पडला. त्यामुळें सर्व सभा दणाणून गेली. धुळीनें सर्व कोंदून गेलें. रावणाच्या दाहाही तोंडांत माती जाऊन रक्त वाहू लागलें. असें पाहून सीतेस मोठा हर्ष झाला. रावणाचे प्राण कासाविस होऊन गेल्यामुळें तो मोठ्यानें ओरडून ह्मणाला, सर्वांनीं धावून हें उरावरील धनुष्य काढा. जनकास हाकमारून ह्मणाला, अरे मी आतां खचित मरणार, परतु इंद्रजित, कुंभकर्ण हे माझ्या मागें आहेत ते तुझा सूड घेतील.

जनकराजा अगदीं घाबरून ह्मणाला, आतां हें धनुष्य उचलण्यास समर्थ असा एकही वीर दिसत नाहीं. परशुरामानें एकवीस वेळां शोधन करून सर्व पृथिवीवरील क्षत्रिय नाहींसे करून टाकिले. या सभेंत तर हें धनुष्य उचलण्यास समर्थ अशाचें नाव सुद्धां घ्यावयास नको.

इतक्यांत जसा निद्रिस्थ सिंहास जागा करावा, किंवा याज्ञिकानें अग्नीला फुंक मारावी, त्याप्रमाणें विश्वामित्रानें रामास खूण केली, कीं हे नरवीरपंचानना, पाहतोस-काय, ऊठ, आणि शत्रूच्या पोटावरील धनुष्य उचलून त्यास जीवदान दे. अशी विश्वामित्राची आज्ञा होताच जसा उदयपर्वतावर सूर्य किंवा महायागामध्यें पूर्णाहुति होतांच जशी आराध्य देवता प्रगट व्हावी, त्याप्रमाणें त्या सीतास्वयंवररूपी महायागांत रावणाची पूर्णाहुती होताच, आपणावाचून ही दुसऱ्यास वरणार नाहीं ह्मणूनच काय नकळे, (तें सीतेचें आराध्य दैवत,) सर्वांतरयामी श्रीराम, उठून उभा राहिला. त्याकडे सर्व राजे टकमकां पाहू लागले. सर्वांनीं जरी उत्तमोत्तम वस्त्रालंकारादि श्रृंगार केले होते तरी त्या सर्वांत श्रीरामच विराजमान् दिसत होता. सन्मान पुरःसर, मंगलप्रीत्यर्थ विश्वामित्रास व इतर ब्राह्मणांस नमन करून तो राजकुमार रामचंद्र रंगमंडळावर आला, त्यास पाहून सीतेच्या हृदयांत आनंदाच्या लहरी उठूं लागल्या.

जीच्या नखावरून कोटि मदन ओंवाळून टाकावे. जी केळीच्या गाभ्यास लाजविणारी व नूतन पल्लवांत काठिण्य दाखविणारी अशी ती सुकुमार रामचंद्राची मूर्ति पाहून सीता फार घाबरली. तिला वाटलें कीं,

कांसवाच्या पाठीसारखें कठीण असें हें मदनशत्रूचें धनुष्य, हा मदनमूर्ति राम कसें उचलील! लाज सोडून सीता ह्मणाली, हे तात हा तुमचा पण फारच हो दुष्कर आहे ! अहो, ज्या धनुष्यानें ह्या पर्वतासारख्या विशाल रावणास बलहीन करून सोडिलें तें धनुष्य, चंद्र-किरणही ज्याचे शरीरास खुपणार अशा ह्या राजकुमारास कसें बरें सहन होईल ! हे तात, तुमचा पण कितीतरी अनिवार आहे हा ! मला दुसरावर मुळींच आवडत नाहीं. आणि हा पण तडीस नेणें तर ह्या राजपुत्रास मोठें भयंकर व दुस्तर आहे. ही मूर्ति अंगानें तरी मोठी आहे काय? तर तेंही नाहीं. हे तात, फार काय सांगूं रामचंद्रावाचून सर्व पुरुष मला तुझ्या सारखे आहेत. जर का दुसरा कोणी मला वरण्या करिता सिद्ध होईल, तर, खचितच प्राण-त्याग करीन. सखे विजये हा पिता नव्हे; मला वैरी वाटत आहे. कारण, हा दुष्कर पण सोडून मला ह्या मदन-मूर्तीस अर्पण करीत नाहीं.

असें सीतेचें आपल्याविषयीं प्रेम जाणुनच काय तो, दिग्गजच; असा तो दशरथ राजा, त्याचा छावा त्या इक्षु-सम धनुष्यास पाहून मोठ्या उत्कंठेनें त्याजवळ जाण्यास निघाला. जवळ जातांच त्या रावणरूपी कमलवनांत नि-शंकपणें प्रवेश करून सहज गतीनें हस्तवदनरूपी कम-

लांस तुडवीत तो त्या कोदंडेक्षुसमीप जाऊन उभा राहिला. सर्व राजे व नरनारी तटस्त होऊन हा राम विजयी होवो आणि ह्यासच ही सुंदर नवरी माळ घालो; असें मनांत ह्मणूं लागल्या. सर्व ब्राह्मण रामाचें कल्याण चिंतून ह्मणू लागले कि, हें भवचाप मोडून हा सत्वर विजयी होवो.

" नीलकमलाप्रमाणें ज्याची अंगकांति असा हा सुकुमार राम वयानेंही लहान आहे. यास हें प्रचंड धनुष्य उचलेल तरी कसें? किती हो हें चिमणें बालक. अहो सिंह लहान दिसतो खरा परतु पर्वतासारख्या हत्तीला एका क्षणात फाडून टाकितो. अहो त्या लहानशा अगस्ति ऋषीनें एका आचमनांत अफाट समुद्र शोषून टाकिला, नभोमडळांत सूर्य लहान दिसतो खरा परतु त्याचा प्रकाश सर्व पृथ्वीवर पडत आहे". अशा प्रकारें सर्व लोक आपल्या मतें तर्क करू लागले.

रामानें विद्युल्लतेसारखें आपलें उत्तरीयवस्त्र सांवरून कमरेभोवतीं गुंडाळलें. रामाच्या मस्तकावरील रत्नजडित मुगुट हा सूर्यच काय? व त्यामुळेंच कस्तूरीनें रेखलेलीं आकर्णनयनें हींच कोणी कमलें विकास पावलीं आहेत काय? दोहोंबाजूनीं नाभीपर्यंत आलेले केशपाश, मस्तकोरील शेषाचे पुच्छभागच काय असें वाटत होतें. तरुणपणांतील भूषणानीं तो रामचंद्र फारच रमणीय दिसत होता. सुगध-

सर्वत्र अशा नानाविध अगरांच्या सुवासानें सभेच्या आ-समंताद्भागीं भ्रमरांच्या झुंडीच्या झुंडी येऊन गुंजारव करू लागल्या. त्यामुळें हीं पुढील मंगलप्रदर्शक वाद्येंच वाजत आहेत काय? असा भास होई. असा तो राजपुत्र रामचंद्र तें धनुष्य पूर्ण अवलोकन करून ह्मणाला कीं, ' ह्या दिव्य धनुष्यश्रेष्ठास मी हस्तानें स्पर्श करितों; परंतु ह्याचें तोलन करणें अथवा कर्णपर्यंत आकर्षण करणें ह्याविषयीं माझा यत्न सफल होईल काय?''

असें रामाचें भाषण ऐकून जनकानें व विश्वामित्रानें मंगलकारक उत्तर दिलें कीं, ''ठीक आहे,'' विश्वामित्र ह्मणाला, हे वीरश्रेष्ठा, आतां सर्वांची संशय निवृत्ति करण्यास उशीर लावू नको. तेव्हां जनक ह्मणाला, हे मुने, हें श्रेष्ठ धनुष्य, जनकवंशांतील देवराजा शिवाय अन्य राजानीं व महापराक्रमी अशा इतर राजांनीं हें उचलण्यास असमर्थ व अशक्त जाणून त्यांनीं देवासारिखें पूजिलें आहे. विश्वामित्र ह्मणाला जनका, क्षणभर धीर धर आणि हा वैकुंठनायक श्रीराम काय कौतुक करील तें पहा.

वत्सा रामा, तूं यशस्वी होशील. अशा विश्वामित्राच्या आज्ञेनें राम त्या धनुष्यास स्पर्श करीत असतां ते केशपाश रावणाचे हृदयास लागले. तेव्हां असें वाटलें कीं, हे शेषाचे पुच्छभाग, त्या दुष्ट व अमंगल रावणाचें हृ-

दय विदारण करीत आहेत काय! व ह्मणूनच ते रामानें सावरून घेतले. कारण, अवतारकृत्य येथेंच समाप्त होईल. असो.

नंतर रामानें तें धनुष्य पायाच्या आंगठ्यानें वर उचलून अनायासें त्यास हातानें मध्यभागीं धरलें. नंतर हजारों राजे व लोकसमक्ष तो धर्ममूर्ति व रघुकुलास आनंददायक असा राम, तें धनुष्य सज्ज करून साहजिक आकर्णपर्यंत ओढित असतां तें मध्यभागीं भग्न झालें त्यावेळीं वज्रपाता सारखा मोठा भयंकर शद्ब झाला. विदारण पावणाऱ्या पर्वताच्या समीपप्रदेशात जसा भूकंप होतो तसा तेथें भूकंपही झाला. त्या भयंकर शद्बाच्या योगानें मुनिश्रेष्ठ विश्वामित्र व जनकराजा तसेच राम लक्ष्मण याशिवाय सर्व मोहित होऊन पडले.

नंतर कांहीं वेळानें सर्व सावध झाले. रावण अधोवदन होऊन जाऊं लागला त्यावेळीं असें वाटलें कीं, हा सीतारत्न हरण करण्याकरितां आलेला चोर, सांपडल्यामुळें हा अपराधी दीन होऊन गेला आहे. अथवा रणांत अपयश प्राप्त झाल्यामुळें ह्या वीराचें तोंड अगदीं उतरून गेलें आहे. अथवा पहिल्यानें आपणच आपली प्रतिष्ठा सांगून शेवटीं तोंडघशीं पडल्यामुळें ह्यास आतां तोंड दाखविण्याची लाज वाटत आहे. किंवा हा जातिभ्रष्ट अ-

सल्यामुळें ह्यास सर्वांनीं आपल्यातून घालवून दिलें आहे. अथवा हा रावणरूपी कोल्हा, रामरूपी सिंहाचा ग्रास घेण्याकरितां गुहेंत गेला असतां मोठ्या नशिबानें सिंहाच्या तडाक्यांतून सुटून जात आहे. असो याप्रमाणें तो निर्लज्ज हतधैर्य रावण प्रधानासह निघून गेला.

त्या रघुकुलावतंस सुकुमार रामचंद्रानें तें प्रचंड धनुष्य भग्न केलें हें पाहून सर्व ऋषिमंडळ सद्गदित झालें अनावर प्रेमावेशांत विश्वामित्रानें धांवत जाऊन रामास आलिंगन दिलें रामाचें मुख कुरवाळून विश्वामित्र ह्मणाला हे आदिपुरुषा रामा, केवढी ही तूं अद्भुत लीला करून दाखविलीस बा सावळ्या रामचंद्रा, तुझ्या ह्या कृत्यावरून पृथिवी ओंवाळून टाकावी इतकेंच नव्हे, तर ह्या माझ्या जिवाची तुजवरून कुरवंडी करून सोडावी, इतक्यांत हत्तिणी वरून लावण्यखाणी सीता खालीं उतरून गजगती प्रमाणें, रामाकडे येत असता पृथिवीस फारच आनंद झाला. कारण, आतां ह्या माझ्या कन्येनें पूर्णब्रह्म सनातन रघुनंदनास वरिलें ह्मणजे हा माझा जांवई होईल. ती हंसगामिनी सिता रामास अनुलक्षून चालत होती तेंव्हां असें वाटलें कीं, आपल्या प्रिय सीतेला रामानें वरावें ह्मणून पदभूषणें मंजुल शद्बानीं त्याची स्तुति करित अहित काय? अशा प्रकारें ती सीता नम्रता पूर्वक रामा

जवळ गेली आणि प्रफुल्लित अंतःकरणानें तिनें रामाच्या गळ्यांत माळ घालून चरणांवर मस्तक ठेविलें.

सीतेनें रामाच्या गळ्यात माळ घालतांच जिकडेतिकडे आनंद झाला नाना प्रकारचीं मंगलवाद्यें वाजूं लागलीं रामानें धनुष्य सज्ज न केल्यास सीतेचा विवाह होणार नाहीं अशी जी जनकाच्या मनांत भीति उत्पन्न झाली होती ती दूर झाली. हा भुवनसुंदर मेघश्याम माझा जांवाई झाला, आज माझ्या सारखा कोणीच भाग्यवान् नाहीं. असें जनकास वाटून मोठाआनंद झाला. नंतर तो जनक राजा हात जोडून मुनिश्रेष्ठ विश्वामित्रास ह्मणाला, हे मुने ह्या दशरथपुत्र रामचंद्राचा पराक्रम आज मी अवलोकन केला.

अत्यंत अद्भुत व अचिंत्य तसेंच कधींही मनांत न येण्या सारखें अर्थात् अतर्क्य असे हे धनुष्याचे तोलनादिक व्यापार घडल्यामुळें माझी कन्या जी **सीता** तिला दशरथपुत्र रामचंद्र हा वर, प्राप्त झाल्यामुळें ती जनक कुलांत उत्तम कीर्ति संपादन करील. हे कुशिककुलोत्पन्न मुने ह्या, सीतेचें मूल्य, पराक्रमच होय अशी जी माझी प्रतिज्ञा होती तीही आज सिद्ध झाली. यास्तव, प्राणापेक्षाही अधिक प्रियकर अशी माझी कन्या सीता रामास देणें योग्य आहे. याकरितां हे ब्रह्मन् माझें कल्याण

आपल्याकडून असें व्हावें कीं आपल्या समतीनें माझ्या प्रधानानीं मोठ्या त्वरेनें अयोध्येस जाऊन, इकडिल वीर्य मूल्य कल्पिलेल्या कन्येचा दानादिक वृत्तांत व रामलक्ष्मण हे विश्वामित्राच्या कृपेनें येथें सुखरूप असून मुनिसह येथें आहेत असें दशरथराजास कळवावें आणि त्यानीं नम्रतापूर्वक दशरथराजास शांत करून प्रीति पुरःसर माझ्या नगरास येण्याविषयीं प्रार्थना करावी.

विश्वामित्रानें 'तू ह्मणतोस हें फार उत्तम आहे' असें अनुमोदन दिल्यावर जनकानें प्रधानास बोलावून त्यांजवळ मंगलकारक वृत्तांताची पत्रिका लिहून देऊन सांगितलें कीं जसें इकडे वृत्त झालें आहे. तसें दशरथराजास कळवून तो मिथिलानगरीस त्वरित येईल असें करावें.

जनकाच्या आज्ञेप्रमाणें ते प्रधान निघाले ते तिसऱ्या दिवशीं अयोध्या नगरीस आले "आह्मास जनकराजानें पाठविलें आहे" असें सांगतांच द्वारपालांनीं त्यास दशरथाच्या मंदिरात पोंचविलें. देवतुल्य अशा वृद्ध दशरथराजास पाहून ते सेवकाप्रमाणें हस्तांजलिजोडून, नम्रपणानें, दशरथास सुखकारक असें, बोलूं लागले. हे महाराजा, मिथिला नगरीच्या जनकराजानें अग्निहोत्रे सर्वाँ ऋत्विज, उपाध्याय व कुलगुरु, तसेच सेवकजन यांसह आपल्यास स्नेहपूर्वक मधुर भाषणानें कुशल व इ-

ष्टही विचारिलें आहे. आणि विश्वामित्राच्या अनुमतीनें आपल्यास असें सांगितलें आहे की, माझी कन्या वीर्य-मूल्य आहे अशी मी केलेली प्रतिज्ञा आपल्यास विदितच आहे आणि त्या प्रतिज्ञेविषयीं पुष्कळ राजे निर्वीर्य होऊन पराजय पावलेलेही आपण जाणत अहां.

हे महाबाहोराजा, विश्वामित्र, मुनीस अग्रेसर करून स्वच्छंदानें गमन करित प्राप्त झालेल्या तुमच्या विशाल बुद्धिमान् रामचंद्रानें मोठ्या राजसभेंतल्या दिव्य धनुष्याचा मध्यभागीं भंग करून माझी कन्या जिंकिली ह्मणून त्याविषयीं आपण अनुमोदन देण्यास योग्य अहां या करितां हे महाराजा उपाध्याय व कुलगुरु वसिष्ठ यांस अग्रेसर करून, त्वरित मथिला नगरीस यावें, ह्मणजे, आपल्यास रामचंद्राच्या विवाहसंबधीं संतोषाचा लाभ होईल.' महाराज आमच्या राजास विश्वामित्रानीं कन्यादानाची आज्ञा केली असून त्यास शतानद गुरु महाराजाचेंही अनुमोदन मिळालें आहे. ह्मणून विदेहाधिपति जनकराजानें हें कल्याण कारक वृत्त, निवेदन करण्याकरितां ही पत्रिका देऊन आह्मांस पाठविलें आहे.

असें त्या प्रधानदूताचें भाषण ऐकून व पत्रिका अवलोकन करून दशरथास मोठा आनंद झाला; वसिष्ठ, वामदेव, तसेच प्रधान ह्यांच्याशीं तो दशरथ राजा बोलू

लागला कीं कौसल्येस आनंद देणारा रामचंद्र लक्ष्मणासह विश्वामित्राच्या कृपेनें सांप्रत विदेह राजाच्या नगरांत सुखरूप आहे. रामचंद्राचा पराक्रम पाहून त्यास आपल्या कन्येचें दान करण्याविषयीं जनकराजा इच्छा करीत आहे. जर तुह्मास त्या विशालबुद्धि जनकाचें हें विवाहविषयक आचरण योग्य वाटत असेल तर वेळ न घालवितां त्वरित मिथिला नगरीस गेलें पाहिजे असें ऐकून वसिष्ठादिकांनीं फारच उत्तम आहे असें सांगितलें. सर्वांचें अनुमोदन मिळाल्यावर "उद्यांच मिथिला नगरीस निघण्याची तयारी करावी" अशी प्रधानास आज्ञा करून दशरथानें जनकराजाच्या प्रधानाचा वस्त्र भूषणांनीं सत्कार केला.

प्रातःकाल होताच मोठ्या आनंदानें दशरथराजानें सुमंत प्रधानास आज्ञा केली कीं, आज भांडारी यानीं अनेक प्रकारचीं पुष्कळ रत्नें व विपुल द्रव्य बरोबर घेऊन मोठ्या बंदोबस्तानें पुढें जावें. चतुरंग सेना, शिबिका तसेच अश्व व वसिष्ठादिकांकरितां इतर श्रेष्ठ वाहनें हीं, घेऊन माझी आज्ञा होताच त्वरित निघावें. वसिष्ठ, वामदेव, जाबालि, तसेच काश्यप दीर्घायुषी मार्कंडेयमुनि आणि कात्यायन अशा ब्राह्मणांचें, प्रस्थानकालीं, अग्रभागीं गमन, कल्याण कारक आहे; ह्मणून त्यांनीं वाहनारूढ

होऊन अग्रेसर व्हावें आणि माझा रथ ही त्वरित सिद्ध करावा अशी व्यवस्था ठेवावी.

आज्ञा प्रकारें सुमंतानें सर्व तयारीकेली तेव्हां तें वऱ्हाडमंडळ दशरथाच्या आज्ञे प्रमाणें यथाक्रम मोठ्या थाटानें निघालें, वाद्यांच्या गजरानें सर्वनगर दुमदुमून गेलें. चौथ्या दिवशीं तो दशरथ राजा मिथिला नगरीच्या बाहेरील एका उपवनासंनिध आला. तो जनकराजाही सैर्व सैन्यासह त्यास सामोरा आला. दशरथ व जनक यांनीं एकमेकांस क्षेमालिंगन दिलें. भरतशत्रुघ्नास पाहून जनक ह्मणाला, हे रामलक्ष्मण येथें कोणत्या कारणानें रुसून आले कळत नाहीं. दशरथानें सांगितलें कीं, हे भरतशत्रुघ्न आहेत. तेव्हां जनकास रूपसादृश्याचें मोठें आश्चर्य वाटलें.

**जनक**— हे नरश्रेष्ठा राघवा, आपलें येणें हें आमच्या दैवयोगानेंच घडून आलें, असें मी समजतों. तसेंच सर्व देवांसह जसा इंद्र त्याप्रमाणें सर्वश्रेष्ठब्राह्मणांत ऐश्वर्यसंपन्न व महातेजस्वी असे हे वसिष्ठ ऋषि माझ्या भाग्यानेंच येथें प्राप्त झाले आहेत. प्रारब्धानेंच कन्यादानास प्रतिबंधक अशा विघ्नांचेंही निवारण पूर्वींच झालें आहे. दैवयोगानेंच, पराक्रमाविषयीं श्रेष्ठ अशा रघुकुलांतील महाबलसंपन्न पुरुषांशीं, विवाह संबंध प्राप्त

झाला आहे यामुळें आता आमचें कुल वंद्य होणार. हे राजाधिराजा दशरथा, उदयीक प्रात:कालीं यज्ञसंबंधी अवभृथ नामक स्नानविधि आटोपल्या नंतर, परमश्रेष्ठ अशा ऋषींसहवर्तमान विवाह संपादन करणें योग्य आहे.

असें बोलून जनकानें मिरवत मिरवत तें वऱ्हाडमंडळ स्वयंवरमंडपांत आणिलें. तेथें धनुष्याचे तुकडे केलेले पाहून वीराचे अंगावर रोमांच उभे राहिले. कित्येकांचे नेत्रांतून आनंदाश्रु वाहूं लागले. रामचंद्रास पाहून कौसल्येचें प्रेम हृदयांत मावेनासें झालें. तिनें दृढालिंगन देऊन रामास मांडिवर घेतलें आणि ती ह्मणाली बा सुकुमारा रामा हें परम कठिण धनुष्य तूं मोडलेंस तरी कसें. दशरथानेंही रामास आलिंगन दिलें भरतशत्रुघ्नांनीं रामलक्ष्मणांच्या पायांवर मस्तक ठेविलें रामलक्ष्मणानीं वसिष्ठादिकांच्या पायावर मस्तक ठेविलें वसिष्ठादिकानीं त्यास आशिर्वाद दिले. या प्रमाणें भेटी झाल्यावर चौंफेर मंगल भूषणांनीं भूषित केलेले मंडप घातले आहेत अशीं दिव्य मंदिरें त्या वऱ्हाड्यांस जानवशा करितां दिलीं.

नंतर प्रात:काल होतांच जनकानें संध्यावंदनादि नित्यकर्में आटोपून आपल्या शतानंद नावाच्या कुल गुरूची प्रार्थना केली कीं हे गुरो महातेजस्वी, अतिशय पराक्रमी व अत्यंत धार्मिक असा माझा कुशध्वज बंधु

इक्षुमती नावाच्या नदीवरील सांकाश्य नगरींत राहातो. त्यानें मला यज्ञाची इच्छित सामोग्री देऊन माझा यज्ञ संपादन केला आहे. त्याला पहाण्याची मला फारच इच्छा झाली आहे. तर यावेळीं तो आला ह्मणजे सीता विवाहाचा समारंभ पाहून आनंदित होईल.

असें ऐकून शतानंदानें कित्येक भव्य पुरुष कुशध्वजाकडे पाठविले त्यांनीं सांकाश्यनगरींत जाऊन कुशध्वजराजाची भेट घेतली आणि मिथिलानगरींतील झालेला सर्व वृत्तांत व जनकानें योजलेला सीताविवाह हीं सर्व त्यास सांगितलीं. तें ऐकतांच तो कुशध्वजराजा, मिथिलानगरींत आला आणि त्यानें आपल्या नामगोत्राचा उच्चार करून प्रथम शतानंदास व नंतर जनकास नमस्कार केला. उभयतांच्या आज्ञेनें तो दिव्यासनावर बसला. नंतर उभयता बंधूनीं सुदामन नावाच्या प्रधानास आज्ञा केली कीं दशरथराजाकडेस जाऊन त्यास पुत्र प्रधान इत्यादिकांसह इकडे घेऊन ये. त्याप्रमाणें दशरथाच्या शिबिरात जाऊन त्यानें दशरथास मस्तक लववून नमन केलें आणि सांगितलें कीं, हे अयोध्यापते, मिथिलाधिपति जनकमहाराज आपला पुत्र, मंत्रिजन, उपाध्याय व कुलगुरु ह्यांसह आपल्या भेटीची इच्छा करीत बसले आहेत. असें ऐकून तो दशरथराजा ऋषिसमुदाय व मित्रमंडळी ह्यांसह नि

घून जनकराजाजवळ आला. आणि प्रधान, उपाध्याय, व स्वकीय बांधव यांसह विचार करून बोलू लागला कीं हे महाराजा जनका, इक्ष्वाकुकुलांतील सर्वांचें दैवत व तपोरूप ऐश्वर्यानें संपन्न असे वसिष्ठ ऋषिच आमच्या सर्व कृत्यांत वक्ते असतात हें आपल्यास विदितच आहे. ह्मणुन, विश्वामित्राच्या संमतीनें, सर्व महर्षींसह हे वसिष्ठ ऋषि, आमच्या वंशजाचा उत्पत्तिक्रम यथास्थितपणें आपल्यास कळवितील. ह्मणजे विवाह संबंधास अवश्य जी दाहा पुरुषांची वंशपरंपरा ती आपल्यास समजेल.

नंतर वसिष्ठानें रामलक्ष्मणापर्यंत दशरथाची कुलपरंपरा सांगितली, तेव्हा जनकानेंही आपली कुलपरंपरा सांगून वसिष्ठास प्रार्थना केली कीं, हे मुनिश्रेष्ठ, मी आपल्या —सीता व ऊर्मिला—दोन्ही कन्या अनुक्रमें राम लक्ष्मणास देतों. आपला मजवर अनुग्रह व्हावा. याप्रमाणें त्रिवार उच्चार करून तो जनकराजा दशरथास ह्मणला. महाराज आपण राम लक्ष्मणाचें समावर्तन कर्म व विवाह संबंधि मातृकापूजनादि कृत्य करून नांदीश्राद्ध करावें हे महाबाहो, आपणांस मिथिला नगरींत येऊन आज तीन दिवस झाले. आज मघा नक्षत्र आहे. तर श्रेष्ठ व प्रसिद्ध असा पूर्वा फाल्गुनी नक्षत्रावर विवाह करावा.

रामलक्ष्मणांच्या सौख्योदयार्थ गाई, भूमि, तिल, सुवर्णे इत्यादिक दानें करावीं.

नंतर विश्वामित्र ह्मणाला हे नर श्रेष्ठा जनका, तूं योजलेले विवाह सर्व प्रकारें अगदीं योग्य आहेत. परंतु तुझ्याशीं मला किंचित् बोलणें आहे तें हेंच कीं, तुझा कनिष्ठ बंधु कुशध्वजराजा, मोठा धर्मज्ञ आहे. त्याच्या दोन कन्या सौंदर्यानें उत्तम आहेत. त्या—महा बुद्धिमंत, इंद्रादि लोकपाळा सारखे पराक्रमी, सौंदर्य व तारुण्य यानें सुशोभित व सर्व वर गुणानीं संपन्न अस—दशरथराजाच पुत्र भरत शत्रुघ्न ह्यांस द्याव्या. ह्मणजे, तुह्मा उभय बंधूंचा इक्ष्वाकु कुळाशीं संबंध घडेल इतकेंच नव्हे, तर हे पुण्यशील राजा, तुझ्या चित्ताची व्यग्रताही दूर होईल. हें विश्वामित्राचें बोलणें वसिष्ठासही मान्य झालें. आसनावरून उतरून वसिष्ठ व विश्वामित्र ह्यांस हातजोडून जनक ह्मणाला, महाराज, तुह्मी स्वतांच ज्यापेक्षां हा मजवर अनुग्रह करितां तेव्हां आमचें कुल धन्य आहे; असें मी समजतों. तर भरत शत्रुघ्नांनीं उभयतां—मांडवी व श्रुतकीर्ति ह्या कुशध्वज कन्यांचें पाणिग्रहण करावें. हे मुने त्या महाबलाढ्य चारही राजपुत्रांनीं, चारही राजकन्यांचें पाणिग्रहण, एके दिवशींच विवाहास प्रशस्त अशा पूर्वोत्तर फल्गुनी युक्त समयावर—करावें.

दशरथ जनकास ह्मणाला आपण उभयबंधु सर्व गुण संपन्न आहां आपलें ह्मणणें आह्मास मान्य आहे. आता आह्मी स्वस्थानीं जाऊन यथाशास्त्र नांदिश्राद्धादि कर्मे करितों; नंतर दशरथ, जनकाची आज्ञा घेऊन मुनिश्रेष्ठ वसिष्ठ विश्वामित्र यांस अग्रभागीं करून स्वस्थानीं निघून आला. आणि त्यानें यथाविधि नांदिश्राद्ध केलें प्रातःकाळीं उठून प्रातः संध्यादि नित्यकर्मे केल्यावर सोळावे वर्षी करण्यास, योग्य असें रामचंद्रादिकांचें चौलवत् गोदान कर्म तेंही उत्तम प्रकारें केलें.—कांस्यपात्रांत राहील इतकें पुष्कळ दूध देणाऱ्या असून ज्यांची शिंगें सोन्यानें मढविलेलीं आहेत अशा सवत्स चार लक्ष गाई व पुष्कळ द्रव्य हीं ब्राह्मणास दिलीं.

दुसरे दिवशीं प्रात काळीं दशरथानें स्नानसंध्यादि नित्य कर्मे केलीं; रामलक्ष्मणादिकांचे मोठ्या कौतुकानें मंगलस्नानादिविधि झाल्यावर त्यांस वस्त्रालंकारानीं सुशोभित केलें; नंतर शुभलग्न युक्त विजय मुहूर्तावर वसिष्ठ व इतर ऋषि यांस अग्रेसर करून दशरथ यज्ञशालेसमीप आला. भगवान् वसिष्ठ, जनका जवळ येऊन ह्मणाले हे श्रेष्ठ जनकराजा, पुण्याहवाचनादि मंगलकर्मे केलेल्या पुत्रांसह नर श्रेष्ठ दशरथ, शालामंडपांत प्रवेश करण्याकरिता, तुझ्या आज्ञेची वाट पाहत, दरवाज्यासन्निध उभा आहे.

राजा, दाता व दानें ग्रहण कर्ता, यांचा संयोग झाला तरच दानधर्म घडतो; ह्मणून तूं विवाहयोग्य अशीं लौकिक व शास्त्रोक्तकर्मे करून दशरथास येण्याची आज्ञा दे.

जनक—महाराज, राजवेषास प्रतिबंध करणारा असा माझा द्वारपाल कोण आहे? व तो कोणाच्या आज्ञेची वाट पहात आहे. हे राजा, जसें माझें तसेंच तुमचें आहे. आंत येण्यास विचार मुळींच नको, माझ्या कन्यांचें, विवाहसंबधीं सर्व, मगलकृत्य करून त्यांस वेदी—बहुल्या—जवळ आणून मीच आपली वाट पहात बसलों आहे.

नंतर वसिष्ठाज्ञेवरून रामलक्ष्णादि पुत्र व ऋषिसमुदाय यासह दशरथ, विवाहमडपांत आला, तेव्हा जनक पुढें होऊन वसिष्ठास ह्मणाला— महाराज, ऋषींसह आपण लोकप्रिय रामचद्राचें विवाहसंबंधी सर्व कर्म करावें तेव्हा वसिष्ठानें, विश्वामित्र व शतानंद यांस प्रमुख करून त्या आनंददायक मडपांत विवाहवेदी सिद्ध केली. त्या वेदीसभोंवतीं गंध, पुष्पें, तसेच आम्रपल्लव, सुवर्णाचीं तोरणें, पिवळ्या व पांढऱ्या पल्लावांनीं सुशोभित केलेले सुवर्ण कलश, अनेक प्रकारच्या धान्यांच्या अंकुरांनीं गर्द झालेलीं मृत्तिकापात्रें, धूपानें भरलेल्या हलकारत्या, शंख, सुवे, पळ्या, गंधपुष्पादि पूज्यद्रव्यांनीं पूर्ण भरलेलीं तबकें, लाह्यांचीं तटें, हळदीनें चित्रविचित्र केलेले एकसारखे

अनेक कुंभ आणि दर्भ इत्यादि मांडून ती—वेदी—सुशोभित केल्यावर त्या वेदीवर शास्त्रोक्त अग्नीची स्थापना केली. तेव्हां वराचे पुरोहित वसिष्ठऋषि असल्यामुळें त्यांनीं यथाविधि समंत्रक होम करून वरकृत्य आटोपिलें.

नंतर अलंकार युक्त सीता अग्नीच्या समक्ष व रामचंद्राच्या सन्मुख आणून उभी केली. तेव्हां जनक, रामास ह्मणाला "रामा जें तूं धर्मकृत्य करशील तें सर्व ह्या बाहुबलानें जिंकिलेल्या माझ्या कन्येसह करण्याकरिता हिचें ग्रहण कर व तसें करण्यास योग्य जें पाणिग्रहण तेंहि कर. ह्मणजे ही महाभाग्यशाली पतिव्रता छायेसारखी सर्वकाल तुला अनुलक्षून राहील." असें बोलून जनकानें, मंत्रोक्त रामचंद्राच्या हातावर कन्या दानाचें पवित्रोदक सोडिलें. त्या प्रमाणें लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न ह्यांस अनुक्रमें ऊर्मिला, मांडवि व श्रुतकीर्ति ह्यांचें पाणिग्रहण करण्याविषयीं सांगून त्याच्या हातावर कन्यादानाचें उदक सोडिलें.

नंतर त्या चार बंधूनीं वसिष्ठाच्या अनुमतीनें यथाक्रम सीतादिकांचें पाणिग्रहण करून विवाह संबंधी अग्नि व लग्नवेदी, आणि जनकराजा तसेंच अन्य ऋषि यां सर्वांस सपत्नीक प्रदक्षिणा केल्या, आणि शास्त्रोक्त रीतीनें विवाह कर्म्याची समाप्ती केली; तेव्हां देवांचा ऋषींचा जय शब्द. दि-

व्य दुंदुभीचा घोष नानाविध वाद्यांचे शद्ब, आकाशांतून पुष्पवृष्टि, ह्याची एकच गर्दी होऊन गेली, अप्सरा नृत्य करूंलागल्या, गंधर्वांनीं मधुर गायन आरंभिलें. अशा प्रकारें मोठ्या समारभानें त्या महापराक्रमी दशरथ पुत्रांनीं अग्नीस त्रिवार प्रदक्षिणा करून यथाक्रम सीतादि कन्या वरिल्या.

याप्रमाणें विवाह कार्य आटोपून त्रिरात्रि झाल्यावर जनकाचा निरोप घेऊन दशरथ अयोध्येस जाण्यास निघाला, तेव्हा एकहजार गाई नेपालादि देशातील उत्तमप्रकारच्या शालजोड्या, पीतांबर व दुसरीं अमूल्यवस्त्रें, तुरग सैन्य, सुस्वरूप व अलंकारांनीं भूषित अशा शभर दासी, सोनें, रुपें, मोत्यें, पोवळीं, असें जनकानें प्रत्येक कन्येस निरनिराळें आंदण देऊन दशरथास अयोध्येस जाण्याकरिता निरोप दिला.

नतर मोठ्या समारभानें तो दशरथ राजा पुत्रासहवर्तमान अयोध्येस गेला.

वेंचे

# सीतास्वयंवर.

( विठ्ठल कविकृत )

श्रीगणनायक सिद्धिविनायक मंगलदायक मंगलमूर्ती ॥
स्फूर्तिवरप्रद जान्हविचा न्हद एक सितच्छद-भापरिपूर्ती ॥
भूषण मंडित तुंदिल पंडित शुंड अखंडित दंडितदंडी ॥
कोकनदासन मूषकवाहन विश्वविमोहन विठ्ठलवंदी ॥१॥

कांहीं श्रीहनुमंत नाटककथा कांहीं रघूवंशिची.
कांहीं आदिकविप्रमेयरचना कांहीं गिरा देशिची ॥
पद्यें सार्थक पादपूर्ति रचना नाहींत गौणाक्षरें,
चैत्रींचे नवरात्र रामनवमी पर्यंत गा आदरें ॥ २ ॥

होता पद्माक्षराजा नर करित बहू श्रीसुता होय जेणें ॥
लक्ष्मी स्वप्नांत सांगे हरिभजन करीं प्रार्थिला विष्णु तेणें ॥
भूपाळें याग केला नृपनुर मिनले मातुलिंगी निघाली ॥
देवा दैत्यां न लाभे जनक जननि तैं संगरीं शांत झाली ॥२॥

पद्मावती नगर उद्वस झालियानें ॥
यागीं प्रवेश करि देववती भयानें ॥
गेलें अरिष्ट मग तैं करि वन्हिसेवा ॥
भोगावया मनिं भजे पति वासुदेवा ॥ ३ ॥

धराया दशग्रीव जों झेंप घाली ॥
असें वाक्य बोलोनि यागीं निघाली ॥
मखाग्नीस मंत्रोदकें शांत केलें ! ॥
तदारत्न संप्राप्त झालें, निमालें ! ॥ ४ ॥

विमानीं बसे घातलें रत्न पेटीं ॥
नवें जाय मंदोदरीलागिं भेटी ॥
दशग्रीव लंकापुरी शीघ्र सेवी ॥
रमारत्न देव्हार चौकीस ठेवी ॥ ५ ॥

पुढें कोणि एके दिनीं रात्रिमानीं ॥
प्रियायुक्त एकांतभोगावसानीं ।
प्रसगें निघाली कथा गोड लागे ॥
दशग्रीव मंदोदरीलागिं सांगे ॥ ६ ॥

अगे रत्ननिक्षेप पेटींत केलें ।
घरा आणिलें काळ कित्येक गेले ॥
तुतें भूषणायोग्य तें रत्न आहे ।
उठें जाईं देव्हार चौकीस पाहें ॥ ७ ॥

मंदोदरी उचलितां नुचलेचि पेटी ।
सांगावया परतली दशकंठ—भेटी ॥
विज्ञापना करि, ह्मणे तुह्मि विघ्न मोटें ।
हें आणिलें निजगृहा परि कर्म खोटें ! ॥ ८ ॥

लंकेश विस्मय करी भयचित्तकांक्षे ।
पेटी किमर्थं नुचले कमलायताक्षे ॥
मी आणितों प्रियतमे ह्मणतोसि काय ? ।
देवालयांत मग रावण शीघ्र जाय ॥ ९ ॥

उचली दशकंधर त्या नुचल ।
जड मांदुसयत्न कदा नचले ॥
मयजा मग काय ह्मणे नृपती ।
अभि वंदुनि ईश करा विनती ! ॥ १० ॥

दशकंठ तिते प्रणिपात करी ।
उघडी मणिमांदुसया उपरी ॥
अति सुंदर त्यांत कुमारि असे ।
समतेशि दुजी भुवनाशि नसे ! ॥ ११ ॥

नयें पूर्ण षण्मास लंकेश देखे ।
तुळेना तिशीं पार्वती रूपरेखे ॥
विलोकून मंदोदरी स्तब्ध झाली ।
पुन्हा मांदुसेमाजि साशंक घाली ॥ १२ ॥

ह्मणे काय मंदोदरी रावणातें ।
तुह्मी विघ्न हें आणिलें आपणातें ॥
इला येस्थळीं सर्वथा नेठवावें ।
पवित्रा स्थळा आणखी पाठवावें ॥ १३ ॥

नृपें दूत पाचारिले, त्यांसि सांगे ।
कुमारीस नेणें तुह्मालागीं लागे ॥
तुह्मी न्या इतें शीघ्र वैदेहदेशीं ! ।
महीमाजी निक्षेपिजे साक्षपेशीं ॥ १४ ॥

हळू झाली पेटी गण उचलिता ते उचलली ।
पुढें नेता पंथीं ध्वानिं गगानिं गो काय वदली ? ॥
ह्मणे आता जातें पुनरपि मि येईन कुमती ।
तुझ्या तेव्हा वंशा क्षयकरिन लकापुरपति ! ॥१५॥

दशग्रीवें शंका हृदयकमलीं पूर्ण धरिली ! ।
गणीं पेटी नेली, मग जनक देशांत पुरिली ॥
पुढें होती पेटी दिन बहुत भूमींत उपरी ।
सवें आला आशीर्वचन जनका ब्राह्मण करी ॥ १६ ॥

विप्रातें नवभूमिदान जनकें संकल्पिलें त्या द्विजा ।
तासीं नागर जुंपिला मनिं ह्मणे पेरीन नाना बिजा ॥
प्रारभीं हलदंत त्या अडकली पेटी समुत्पाटली ।
देवे ब्राह्मण, तों निघे प्रभुप्रति आणी सभा दाटली॥१७॥

राजा ह्मणे द्विजवरा क्षितिदान केलें ।
तें घेइजे तरि पुराकृत पुण्य गेलें ! ॥
क्षेत्रीं धनादि तितुकें तुमचें दयाळा ।
हें आइकें, द्विज ह्मणे परिसें नृपाळा ॥ १८ ॥

दिल्हें क्षेत्र तेव्हां न संकल्प केला ।
तुझ्या गुप्तवित्ता नसें मी भुकेला ॥
कृषी आमुची, हें तुझें देवराया ।
धनाचा मला लाभ नाहीं पुराया ॥ १९ ॥

महा थोर संकष्ट रायासि झालें ।
प्रधानासि राजा ह्मणे विघ्न आलें ॥
धना ब्राह्मणाच्या न आह्मासि घेणें ।
विचारूनि सांगा निकें होय जेणें ॥ २० ॥

जनक परम पुण्यश्लोक त्यातें प्रधानीं ।
दृढमति विनवीलें आमुचे शब्द मानीं ॥
उघडुनि अवलोकीं काय पेटींत आहे ।
तदनुमत विचारी भूपती स्वस्थ राहे ॥ २१ ॥

उघडित मग पेटी त्यांत पंचाब्ज कन्या ।
कुसुमधनुषमूर्ति ब्रह्मरूपा सुधन्या ॥
त्रिभुवन जनित्याचें तें शिरो रत्न भासे ।
जनक, नयनपद्मीं चित्र देखोनि हासे ॥ २२ ॥

संतोषला ब्राह्मण, देखिली सुता ।
दे, देव आशीर्वचनासि मागुता ॥
राजा ह्मणे हे दुहिता दिल्हीभवें ।
दानें द्विजातें करि, भूप वैभवें ॥ २३ ॥

दिसेंदीस संवर्धमानासि पावे ! ।
सुलावण्यासिभूसि तारुण्य धांवे ॥
अकस्मात ये राम षष्ठावतारी ।
महर्षीसवें नारद ब्रह्मचारी ॥ २४ ॥

भार्गवराम तथा मुनि नारद ते जनकाप्रति भेटिस आले ।
बैसविले मुनि विष्टर देउनि आदर देखुनि साधु निवाले ॥
पूजन भोजन गंधविलेपन वंदन सांग यथाविधि केलें ।
षोडश,त्यां उपचार करी स्तुति,भूप ह्मणे निज भाग्य उदेलें ॥

संतोषला परशुराम ह्मणे नृपाळा ।
पाहों तुझी कुमरि लक्षणयुक्त बाळा ॥
आणा वदे नृप ह्मणे परिचारकांसीं ।
तों ते सख्यांसहित खेळतसे विलासीं ॥ २६ ॥

सख्या पांचशें त्यां सवें ते निघाली ।
पुढें चाप देखोनियां स्तब्ध झाली ॥
तिनें शीघ्र केलें धनुर्दंड घोडें ।
वरी बैसली, नाचवी लाडकोडें ! ॥ २७ ॥

राजा ह्मणे न धरिजे मनिं कोप कांहीं ।
अज्ञान बालक इला गुणदोष नाहीं ॥
केलें इनें तव शरासन वज्र घोडें ।
क्रीडा करी तुजपुढें, बहुलाड कोडें ॥ २८ ॥

परशुराम करी जनकीं कृपा ।
धनुष ठेवि ह्मणे सदनीं नृपा ॥
गुण शरासनि योजिल जो इला ।
वरिल हा पण दारुण बोलिला ! ॥ २९ ॥

तो गेलिया जनक काय ह्मणे प्रधाना ।
सीतास्वयंवर किजे वचनार्थ माना ॥
तों ते पुरोहित वदे, ति करा अनुज्ञा ।
हें मानलें, अमृतवाक्य विशेष सुज्ञा ॥ ३० ॥

पत्रें कुंकुम-मंडितें लिहुनियां दूता दिलीं भूभुजें ।
आणा भूतळिचे नरेंद्र तितुके सगें स्वतन्त्रीं बुजें ॥
स्वर्गींचे सुर सिद्ध सप्ततळिचे शेषादि राजे मुनी ।
विश्वामित्र समागमें द्विजऋषी घेऊनियां वदुनीं ॥ ३१ ॥

राजाज्ञा मुकुटीं तुरवुनि गणीं गंतव्य केलें असे ।
पत्रें कुंकुममडितें तिहिं दिलीं, ज्या ज्या स्थलीं जो वसे ।
गावीं पुत्र नसे, तयास्तव नये राजा अयोध्यापति ॥
आलेल्या व्यतिरिक्त सर्व नृपती ऐशी कथा सन्मति ॥ ३२ ॥

सौमित्रि, राम, ऋषि, भद्रवनासि आले ।
देखोनियां विपिन रम्य निवात झाले ॥
छाया सुशीतल कुशोपवनीं निवाले ।
केला रथ स्थिर, रघूत्तम मद चाले ॥ ३३ ॥

यानंतरें उतरिजे परपार रामें ।
केलें स्वकर्म, सवनादिक पूर्ण कामें ॥
आरूढले तिघ रथावरि सैन्य मागें ।
आले समीप मिथिले, पवनानुवेगें ॥ ३४ ॥
विश्वामित्र समागमें द्विजमुनी आले वनीं राहिले,
दूतीं जाणविला वृतांत जनका सामंत पाचारिले ॥
सामोरा नृप जाय, त्या उपवनीं वेष्टीत सेनासवें ।
वाद्यें वाजति, सैन्य सिंधुसरिसा शृंगारिला वैभवें॥३५॥
शेटे महाजन सराफ धनाढ्य चाटे ।
वाणी वाणिज्य उदमी पुर-पंथ दाटे ॥
धूळीरसें सकळ धूसर विश्व भासे ।
दूरूनि देखुनि मुनी जनकासि हांसे ॥ ३६ ॥
सहस्त्रावधी त्यापुढें वेत्रपाणी ।
प्रतापोत्कटा वर्णिती भाट वाणी ॥
विदेही नमस्कार साष्टांग घाली ।
पदस्पर्शनें चित्कला एकि झाली ॥ ३७ ॥
समारंभें घोरें मिरवत निघाले वनिहुनीं ।
तदीं सैन्यासगें इतर नृपती दंडधरुनी ॥
नमस्कारा येती, नगरजनपत्न्या द्विज मुनी ।
पुढें नाना वाद्यें जनपद निवारीत नमुनी ॥ ३८॥
सभास्थाना आले, मणिमय दिलें विष्टर तयां ॥
तदा विश्वामित्रा-पुरत वसतां बंधु उभयां ॥

दिसे राया दृष्टी रघुविर परब्रह्म नटलें ।
नृपा लोकां भासे, सदन मदनाचें प्रगटलें ॥ ३९ ॥

श्याम सुंदर मनोहर भासे ।
कासिलें कनक अंबर कासे ॥
मस्तकीं मुकुट कौस्तुभ वक्षीं ।
वांकि तोरड पदीं नृप लक्षी ॥ ४० ॥

क्षात्रियांसि नरनाथ दीसती,
सज्जनांसि अवतार भासती ॥
कौशिकाप्रति पुसे धरापती ।
कोण हे उभयबंधु शोभती ॥ ४१ ॥

तदुपर मुनि सांगे राज्य यांचें अयोध्ये ।
कुमर दशरथाचे वीर हे चंड योद्धे ॥
दिनकर कुल यांचे शिष्य होती वसिष्ठा,
कराणि रघुपतीची आइकें श्रीवरिष्ठा ॥ ४२ ॥

रक्षिला मख रघूत्तमें बरा ।
ताटिका उडविली दिगंतरा ॥
मूळ-पत्र तुमचें विलोकिलें,
त्यां तदा शुभ मुहूर्त साधिलें ॥ ४३ ॥
चालतां विपिन दाट लागलें ॥
ते स्थळीं नवल वर्तलें भलें ॥

शापिलें निजकलत्र गौतमें,
तारिलें पदरजें रघुत्तमें ॥ ४४ ॥

घेतां नाम समस्त काम पुरवी श्रीराम तो हा असे,
आत्माराम गुणाभिराम भगवान् सर्वांतरीं जो वसे ॥
राया तारक ब्रह्मचिद्घन तुतें भेटावया आणिला,
विष्णूचा अवतार सप्तम तुवां भाग्योदयें देखिला ॥४५॥

याचा बंधु सुमित्र यासम सखा शेषावतारीं स्वयें ।
दोघे वीर पराक्रमी त्रिभुवनामध्यें बली निश्चयें ॥
लीलाविग्रहि वेद नीति महिमा प्रत्यक्ष तो हा स्वभू ॥
ऐसें उत्तर आइकोनि हृदयीं संतोषला तो प्रभू ॥४६॥

रामरूप नयनीं विसावलें ।
अंतरीं बहुत हो ठसावलें ॥
तों वदे जनक भूप आपणा ।
व्यर्थ म्यां धनुष योजिलें पणा ॥ ४७ ॥

जानकीसि वर हा निका असे ।
यासम त्रिभुवनीं दुजा नसे ॥
भागधेय उदयो करी जरी ।
मैथिली तरि रघूत्तमा वरी ॥ ४८ ॥

ज्यां ज्या योग्य जसीं स्थलें तसितसिं त्यां त्यां दिलीं आसनें ।
नाना कांचन रत्न संसदि पुढें होती महा गायनें ॥

विश्वामित्र मुनीश्वरादि जनकें पृथ्वीपती पूजिले ।
वाद्यें वाजति भाट गाति बिरुदें सत्कार त्या योजिलें ॥४९॥

जनक मनिं विचारी चित्त कोठें गमेना ।
कठिण धनुष वज्रातुल्य रामा नमेना ॥
भृगुपति गुणचापा तो कदा लंघवेना ।
ह्मणउनि धरि राजा मौनमुद्रा, वदेना ॥ ५० ॥

अमुप नृप मिळाले सार्वभौमाभिधानी ।
त्रिदश दनुज आले लंकनाथाभिमानी ॥
सदसि धनुष आणा प्रेरिलें मंत्रियातें ।
मग सकळ निघाले चाप आणावयातें ॥ ५१ ॥

दिग्मातंग जसे मदोन्मत तसे धूरोसि आटोपिती ।
चौदाशें मतवैल रानखुळगे सोळाशतें जुंपिती ॥
जेठी लोटिति सासहस्र धनुषा सायासितें आणिलें ।
दिग्चापासमतुल्य भूभुजसभे रंगांगणीं टाकिलें ॥५२॥

प्रगट जनक बोले, भूपती आइका हो ।
विनवित सकळांतें मी उभारूनि बाहो ॥
भृगुपति गुण चापा ज्या चढे त्यासि शाली ।
त्रिभुवनजयलक्ष्मी मैथिली माळ घाली ॥५३ ॥

अजासर्पन्यायें नृप धनुष देखोनि विटलें ।
स्फुरद्रोमाअगीं पुलकित गलद्बिंदु सुटले ॥

संग्रहालय

मृतच्छाया आली अचुक भय पोटांत भरलें।
शरीरें प्रेतांचीं धरुनि ह्मणती आयु पुरलें॥१४॥

प्रधानें सर्वांतें नमुनि मग केली विनवणी ।
उठानां कां ? स्वामी धनुष उचलाया दृढपणी ॥
प्रतापांचे मेरू, बळकट महाख्याति धरणी ! ।
तुह्मी आहा पाहा सचकित न राहां नृपगणीं ॥१५॥

वृक्षाच्या लांब शाखा कर चरण तसे पर्वतातुल्य माथा ।
दाहा तोंडें करालें सचकित नृपती देखती लंकनाथा ॥
मोठा आजानुबाहो रजनिचरपती बोलता काय झाला ।
सालकारें विराजे नवजलदतनू दर्प सर्वा नृपांला ॥१६॥

दुर्गा गणेश गुहनंदि शिवःसभेला ।
कैलास ज्यां भुजबळें श्लथरूप केला ॥
तो मी धरीन पडतां नभ वामबाहें ।
कोदंड खंडिल असा नृप कोण आहे ॥ १७ ॥

विद्या सत्कुल भाग्य कीर्ति सकळीं संपन्न मी भूतळीं ।
दंडी खंडिन येक्षणीं भुजबळें कोदंड भूमंडळीं ॥
पाहा मत्पुरुषार्थ गर्जुनि उभा राहोनि तेथें करी ।
तों सीता उपरीवरी सहसख्या पाहे सभा सुंदरी॥ १८ ॥

तो हा दशानन सभेंत उभा विराजे ।
हे सार्वभौम मशकासम त्यासि राजे ॥

देखोनियां धरणिजा भयभीत झाली ! ।
वर्णितसे सखि पुढें रविवंशशाली ॥ ९९ ॥

अयोध्येचा राजा दशरथ महाख्याति जगतीं ।
गभस्तीचे वंशीं नृपसुत निरीक्षीं रघुपती ॥
असे मार्गीं केला, मुनियुवतिउद्धार चरणें ।
पुढें विश्वामित्रा ऋषिजवळि तो त्वां वळखणें ॥६०॥

माथां कोटीर साजे जडित फणिमणी तेज दिग्प्रांत माजे ।
कर्णीं श्रीकुंडलीं जे मणि लखलखती ज्यांसि चंद्रार्कलाजे॥
नाना रत्नीं विराजे, पदक हृदयिंचें रावणालागिं डाजे ।
वीदांचा घोष गाजे,निबिड पदयुगीं तो उरीं वज्रराजे॥६१॥

भाळीं त्रिपुंड्र, कर वर्तुलदंड दोन्ही ।
सामुद्रिकीं सकललक्षणयुक्त चिन्हीं ॥
आपादमस्तकिं रुळे नववैजयंति ।
कंठीं नवीन तुलसीस्रज भाग्यवंती ॥ ६२ ॥

क्वणत्किंकिणी क्षुद्रघंटा नितंबीं ।
महा रत्नकांची निनादे विलंबी ॥
करीं चाप. नाराचतो देख दृष्टीं ।
शरीं अक्षयी बांधिला तूर्ण पृष्ठीं ॥ ६३ ॥

इंद्रनीळ मणिकीळ सांवळा ।
काति कोटि कुसुमेश पूतळा ॥

कंकणें जडित मुक्त हस्तकीं ।
रत्नपुंजअवतंस मस्तकीं ॥ ६४ ॥
निर्धनासि धन जेंवि सांपडे ।
जानकीस नयनीं तसापडे ॥
अंतरीं मदनमूर्ति रंगली ।
बाह्य दृष्टिसि समाधि लागली ॥ ६५ ॥
उपरि सावध होउनि जानकी ।
मग ह्मणे परिसें विजये सखी ॥
रघुवराविण कांत मना नये ।
त्वरित भेटावें, तो मजला सये ॥ ६६ ॥
कठिण कांसवपृष्ठ तसें धनू ।
मदनमूर्ति रघूत्तमआननू ॥
विजयि होईल काय कळे मला ।
अहपित्या पण दारुण घातला ॥ ६७ ॥

## सवाई.

राम दिसे सुकुमार निमासुर सुंदर नागर मन्मथ गाभा ।
हस्त सुकोमल अंबुदशामल चामर कुंतल पट्पद ओभा ॥
वज्रशरासन त्या प्रति शासन केविं घेउं रघुनंदन हातें ।
रावण हें उचलील कदाचित तैं तनु टाकिन वाट पहातें॥ ६८॥
येरीकडे रावण सिद्ध झाला ।
कोदंड दंडें उचलावयाला ॥

अन्य प्रभू त्यासम कोण तोले।
देखोनि सीता मग काय बोले ॥ ६९ ॥

लंकेशा नुचलो शरासन महीमातेसि, सीता ह्मणे ।
अंबे मंगलमातरे सुखकरे तस्मैनमो ब्रह्मणे ॥
देवद्रोहक हा छळीं क्षितितळीं पाडीं उताणा वरी ।
चक्रन्यायजवें उरावरि भ्रमो कोदंड वज्रा परी ॥७०॥

ओढी चाप विसांभुजीं न गवसे तों मांडखुंटी बसे ।
जानू टेकुनि भूमिसी भुजबळें तोलूनि पाहातसे ॥
हालेना तिळमात्र या उपरि तें कोदंड, आलिंगिलें ।
पोटीं धाक न माय कंप सुटला, गुल्फावरी आणिलें॥७१॥

झालें तोलें प्रतापें धरित विसभुजीं आणिलें जानुदेशीं।
टेंका पृथ्वीसि ज्याचा शिथिल डळमळी नावरे यास्रपेंसी॥
सर्वांगीं स्वेद दाटे, धनुष उलथलें वायु त्या साह्य झाला ।
त्याच्या झोकें उताणा क्षितिवरि पडला, नादधात्रीं रिझाला ७२

ज्या चापें त्रिपुरें विशाल नगरें निर्दाळिलीं शंकरें ।
तें क्रोधें करिं घेउनी उचलितां उद्विग्न झालीं पुरें ॥
रक्ताच्या उळट्या वमे भडभडां प्राणांत आरंभिला ।
तेंव्हा त्याजवळी प्रधान निकरा देखूनि धाविन्नला ॥७३॥

सदसि जनकरायें काय विज्ञाप्ति केली ।
दशवदन भुजांची शक्ति खुंटोनि गेली ॥

लववुनि शिव चापा ज्या चढे त्या उदारा ।
त्रिभुवनजयलक्ष्मी मैथिली होय दारा ॥ ७४ ॥

गांभीर्य धैर्य बहु वीर्य तुह्मासि आहे ।
या माजि एक हि तुठे धनुषा न पाहे ॥
पृथ्वींत वीर दशकंधर काय होता ? ।
तो भंगला गरुड दृष्टि जसा कपोता ! ॥ ७५ ॥

ऐसें उत्तर आइकोनि ऋषिनें रामाकडे पाहिलें ।
आज्ञा पूज्य, समर्थ राघव ह्मणे, तों लक्ष्मणें बोलिलें ॥
झाला रावणमानभंग, जनकें निर्वीरसें मानिलें ।
हा तो शब्द न साहवे रविकुलीं, आह्मा उणें आणिलें ॥ ७६ ॥

घातली सुदृढ कास राघवें ।
वंदिलें गुरुपदाब्ज लाघवें ॥
ठेविला वरद हस्त मूर्धनीं ।
पाव तूं विजय चाप मर्दुनी ॥ ७७ ॥

नाना तिणें नवसिले सुरभूमि साक्षी ।
भगावया धनुष ऊदित सर्व साक्षी ॥
श्रीमूर्ति ते उभि असे, नृपतींत देखा ।
त्याच्या स्वरूपि दुसरा करि कोण लेखा ॥ ७८ ॥

उल्हासें चमकूनि जाय, धनुषापाशीं उभा राहिला ।
सांगातें अवघे पुरोहित पुढें श्रीराम तो एकला ॥

कोदंडासि सभेसमोर उजवें घालोनियां वंदिलें ।
कोदंडें उचलोनियां चढविलें, कर्णांत तें ओढिलें ॥ ७९ ॥

कोपे शेष, उलंडलीं उडुगणें, हेलावला वारिधि ।
राजे विस्मित, राम सस्मित उभा जो शौर्यतेजोनिधि ।
विश्वामित्र सुमित्र मित्र अवघे भूपाळ मारू, करू ।
लंकेशा जनकादि त्यांत विजयी कोदंडदीक्षा गुरू !॥८०॥

पुढेंआला बाहो पसरुनि तदा कौशिकमुनी ।
तयातें वंदूनी रघुवर वदे नम्रवचनीं ॥
ह्मणे स्वामी झाला विजय, धनुषा पासुनि मला ।
गुरूआशीर्वादें सकळभव संतापहरला ॥ ८१ ॥

निघाली पद्माक्षी घवघवितशृंगारसरिता ।
जिच्यासौंदर्यासी झुरझुरति सामान्य बहुत। ॥
पदें मंदें टाकी गजगमनगा मंजुवितनें ।
महाद्वारीं केलें प्रकट, निजरूपा मग तिणें ॥८ ॥

सीताधी रघुवीर धीरनयनीं देखोनि आनंदली ।
हातीं घेउनि माळ बाळहरिणी नेत्रापुढें पातली ॥
देवर्षीनृपसूर्य साक्ष धरणी लोकीं सभादाटली ।
हर्षें तेसमयीं रघूत्तमगळां माळा निकी घातली !॥८३॥

वाद्यें वाजति नाचती सुरसती गंधर्व आलापिती ।
आशीर्वाद मुनींद्र देति अवघे मंत्राक्षता घालिती ॥

भाटांगौरविलें सभेसि जनकें सूर्यांश जे वर्णिती ।
त्यांतें द्रव्य अपार देत नृप तो राजे सभे पाहती ॥८४॥

धनुर्यागा, भांतीं नृपसकळ गेले स्वनगरा ।
ह्मणे विश्वामित्राप्रति जनकराजा मुनिवरा ॥
स्वहस्तें गोसावी लिखित अजपुत्रासि लिहिजे ।
प्रधाना प्रेरावें निजकुल तुह्मी सार्थक किजे ॥ ८५ ॥

विश्वामित्रें लिखित लिहिलें बुद्धिमंतें स्वहस्तें ।
पूर्वारंभीं प्रभुतिंसकळीं भूतकर्मे प्रशस्तें ॥
प्रज्ञावंतें कुशल दिधलें आपुलें पत्र रायें ।
वार्तासांगे नृपदशरथालागिं आणा उपायें ॥ ८६ ॥

गेले प्रधान तिसरे मजले अयोध्ये ।
सेनासमूह सरिसे बळिवत योद्धे ॥
वदूनियां दशरथाप्रति पत्र देती ।
वाक्यें समर्थक सुधावचनें वदे, ती ॥ ८७ ॥

नृपतिदशरथातें प्रार्थिले राजमन्त्रीं ।
विनवणि जनकाची वाचिजे सांग पत्रीं ॥
मग लिखित वसिष्ठें वाचिलें हर्षमानें ।
अजसुत निजचित्तें आइके सावधानें ॥ ८८ ॥

ऋषीविश्वामित्रें प्रणमुनि वसिष्ठासि पहिलें ।
पुढें आशीर्वादें नृपदशरथा पत्र लिहिलें ॥

यशोद्वारांमध्यें त्रिभुवनि तुझी कीर्ति मिरवे ।
तुझे राया दोघे कुमर सुखि आहेत बरवे ॥ ८९ ॥

धनुष दमुनि झाली जानकी, रामभार्या ।
म्हणउनि तुम्हि यावें सर्वथा लग्नकार्या ॥
विधियुत परिणावी मैथुली लग्नदानीं ।
दशरथ हरिखेला घाव घाली निशाणीं ॥ ९० ॥

सुमतासि पाचारिलें भूमिपाळें ।
म्हणे सैन्यपालाणिजे शीघ्रकाळें ॥
नृपाज्ञेसि वंदूनि माथा महंतें ।
चमू सिद्ध केली प्रधानें सुमंतें ॥ ९१ ॥

भांडारें बहु फोडिलीं दशरथें जीं जीर्ण संपादिलीं ।
द्रव्यें बाहिर आणिलीं मग रथीं अश्वीं गजीं लादिलीं ॥
रत्नें फार अमोलिकें नृपवरें दिव्याबरें घेतलीं ।
भूपा हर्ष नसांठवे त्रिभुवनीं वाद्यें रवें मातलीं ॥ ९२ ॥

मार्कंडेय वासिष्ठ काश्यप ऋषी हे चालिले गौरवें ।
जाबाली मुनि वामदेव बहुधा कात्यायनादि स्वयें ॥
भूपाळें नरवाहनीं बसविले जेसृष्टिकर्ते दुजे ।
श्रोत्री साधु महानुभाव सरिसे जे स्वाधिकारी पुजे ॥९३॥

गजस्कंधीं एकाहुनि अधिक एका प्रभुरथीं ।
विमानीं देवांसीं इतर नरभानीं पुरमती ॥

समारंभें नाना दशरथ निघे, जाय मिथिले ।
असे आला चौथे वसतिस पहाया जन मिळे ॥९४॥
समारंभें आला जनक, मग भेटे दशरथा ।
तया मागें भेटी त्रिभुवनपती पितृासि तथा ॥
वसिष्ठासी तेव्हां नमुनि मुनिला क्षेम दिधली ।
सभे आले तीं तीं कथिन अभिधानें तिं सकळीं ॥९५॥
भूपाळें भरता स्वनेत्र कमळीं श्रीरामसा देखिला ।
सौमित्रासमरूप भासत पुढें शत्रुघ्न तो देखिला ॥
राजा विस्मित होय त्याच समयीं भेटावया कारणें ।
विश्वामित्र सुमित्र राघव तिथे आले सभे पाहणें॥९६॥
विश्वामित्र मुनीश्वरा कवण हे राजा पुसे सांवळे ।
कैकेपासुनि पुत्र हे दशरथा सांगे ऋषी जावळे ॥
कौसल्यात्मज रामलक्ष्मण तया माता सुमित्रा सती ।
ऐसें उत्तर आइकोनि मुनिशीं बोले पुन्हा भूपति॥९७॥
सीता राज्य हरावयासि मिथुळे आला सुधन्वापणें ।
त्यातें मारुनि राज्य घेउनि दिलें म्या बांधवा कारणें ॥
तो मद्बंधुसखा कुशध्वज असे राजा सकाशी पुरी ।
कन्या दोनि तयासि त्या असति हो वधुद्वया अंतुरी ॥९८॥
मांडव्या श्रुतकीर्ति एकि भरता शत्रुघ्नया दूसरी ।
सौमित्रा प्रति उर्मिला क्षिति सुता श्रीरामचंद्रा वरी ॥

---

१ जनकराजानें.

मार्कंडेय वसिष्ठ काश्यप नृपापाशीं सभे भीतरी ।
निर्धारा शुभलग्न वेळ जनका विज्ञापिजे यापरी ।। ९९ ।।

उत्तरा फाल्गुनी तारका त्यादिनीं ।
लग्न निर्धारिलें मध्यमे यामिनीं ।।
सूर्यवंशावली श्रीवसिष्ठें मुखें ।
वर्णिली आइका श्रीभूपती सन्मुखें ।। १०० ।।

ते काळीं भरतासि मातुळसखा आला असें पाहुणें ।
लग्ना राहविलें तया दशरथें युद्धाजिता कारणें ।।
आले गोत्रज इष्टमित्र समर्थी लग्नासि पाचारिले ।
केलें गौरव त्यांसि मंडप दिले स्थानांतरीं राहिले ।। १ ।।

केला लग्नविचार सार जनकें घेऊनि आज्ञा फुलें ।
आलासे निजमंडपासि मिरवी सौभाग्य तें आपलें ।।
सीता भूमिसुता स्वयंवरकथा श्लोकार्थवाचा निका ।
वर्णी विठ्ठल सर्ग सप्तम पुढें विद्वांसहो आयका ।। २ ।।

पुण्याहवाचन करी नृप वेदमंत्रें ।
तैसाचि तो विधि किजे अजराज पुत्रें ।।
दोंमंडपीं हळदि लाविलि ओहरातें ।
गर्जेति मगळ तुरें सुख निर्जरातें ।। ३ ।।

नांदिश्राद्धविधान, देवक नृपें संस्थापिलें मंडपीं ।
गोदानें वसनें धनें जनक दे रत्नें द्विजा साक्षपीं ।।

त्यापेक्षां धन वेंचिलें दशरथें उत्साह आरंभिला ।
तेथें श्रीरघुवीर तारक भवा ब्रह्मा स्वयें बोलिला ॥ ४ ॥

उल्हासें वर मंडपीं नृप निघे संगे सुमेधा सती ।
आले बांधव सोयरे दशरथें सन्मान केला अती ॥
नाना ते पट कूट मंडप सभे बैसावया आसनें ।
तेथें श्रेष्ठ वसिष्ठ कौशिकगुरू होती पुढें गायनें ॥ ५ ॥

चारी चौरंग चौघां जनकनृप करी रामसौमित्र पूजा ।
अर्ची तैसाचि कूशध्वज वर भरता युक्त शत्रुघ्न दूजा ॥
रत्नालंकार वस्त्रें विधियुत दिधलीं पूजिल्या दिव्यमूर्ती ।
वेदीं ऋग्वेद तैसा रघुवर सुहृदांमाजि सप्रेम कीर्ती ॥ ६ ॥

मग दशरथराजा पुत्रलग्ना निघाला ।
द्विज मुनि जनसंगें वाहनारूढ झाला ॥
चपळ तुरगयानीं नोवरे शोभताती ।
बहु गजर तुरांचे भाट वाखाणिताती ॥ ७ ॥

मिरवत मग आले मंडपातें निवाडें ।
तव नृपवरदासी लिप्तकेलीं कवाडें ॥
उचित बहु तयातें दीधलें प्रेम दाटे ।
प्रमुदित मग त्यांहीं मुक्तकेलीं कपाटें ॥ ८ ॥

वऱ्हाडी सभा मंडपीं सर्व आले ।
विचित्रासनीं बैसते सर्व झाले ॥

पुढें नोवऱ्या आणिल्या मंडपासी ।
अयोध्यापती सागपूजी तयासी ॥ ९ ॥

दशरथ फल वस्त्रें भूषणें दिव्य वाहे ।
जनक मग वरातें पूजितां होय पाहे ॥
विधियुत मधुपर्कालागिं संपादिलेंसे ।
उभय कुलउपाध्ये त्यांसि सतोषिलेंसे ॥ १० ॥

लग्नाची घटिका प्रतिष्ठिलि जनीं आरंभिली तांतडी ।
वस्त्रें नेसविलीं चहु वधुवरां संलग्न आली घडी ॥
मध्यें अंत्रपटासनादि  गणिकीं दोहींकडे काढिलीं ।
होती मंगलमंत्र लग्नसमयीं तूष्णीं सभा राहिली  ॥११॥

मत्तेभाननषट्पदाकुलगलद्गंडांतदानोदकें ।
हस्ती पाश वरा भल्या कुशपदा संऱ्हष्ट जो मोदकें ॥
कांची वस्त्र कटीं त्रिनेत्र निढळीं चन्द्रार्ककंठींफणी ।
ऐसा मंगलमूर्ति तो  सुरगणीं कुर्यात्सदा मंगल ॥ १२ ॥

लक्ष्मीकांतपदारविंदभजनीं निष्ठा असोद्या वरी ।
झाली पूर्ण घडी वसानसमयीं राहोत वाजंतरी ॥
आधीं नोवरि अक्षता वरि शिरीं घालोनि रामा वरू ।
सोडा अंत्रपटा ह्मणे कुलगुरू कुर्यात् सदामंगलं ॥ १३ ॥

ओंपुण्या ह्मणुनी चहूं वधुवरीं दिव्याक्षता घालिती ।
श्रीरामासहवर्तमान नवरे जायासि वीराजती ॥

वाद्यें वाजति विप्र मंत्र ह्मणती प्राची मुखी नोवरे ।
चारी पश्चिम दिग्मुखी नवरिया ब्रह्मांड हर्षे भरे ॥१४॥

त्रीसूत्रीं मुतवोनि सूत्रवलयें त्यां वोहरा बांधिलीं ।
आंबा शिंपुनि आणिलीं वधुवरें वेदीवरी बैसलीं ॥
पैं पाणिग्रहणादि सप्तपादिंचे होमासि सपादिलें ।
वामांगीं मग नोवऱ्या वसविल्या द्रव्य द्विजां वांटिलें ॥१५॥

श्रीरामें जनकाप्रति विनविलें आह्मासि आज्ञादिजे ।
प्रार्थी भूप चतुर्थ होम करणें रामें पुन्हा बोलिजे ॥
आहे कार्य विशेष याह्मुनिपुढें येथें नव्हे राहणें ।
बोले भूपति भोजनोत्तर तुह्मी प्रस्थान कीजे ह्मणे ॥१६॥

कास्मीरोदक सारिलें सकळिकीं संपादिलीं मज्जनें ।
रांगोळ्या मणिपर्यळी अडणिया विस्तीर्ण पीठासनें ॥
राजे पंक्तिस बैसले द्विजमुनी वाढी सुमेधासती ।
अष्टौसिद्धि हि वाढिती नवजणीं दीपासओवाळिती ॥१७॥

गंधाक्षता सुमन चंदन भूप दावी ।
अर्पी त्रयोदशगुणी नवरंग लावी ॥
सपादिलें सकळ ऐरिणि पूजनातें ।
राजा अजात्मज निघे पुटभेदनातें ॥ १८ ॥

गजस्कंधी चारी नवचवर डोलीं वधुवरें ।
पुढें नानावाद्यें अपशकुन झाले अवसरें ॥

तया विश्वामित्राप्रति दशरथें चिन्ह पुसिलें ।
भविष्याचें प्रत्युतर मुनिवरें त्यास दिधलें ॥ १९ ॥

वस्त्रें कापडिलीं दुकान मखरें उंचावलीं तोरणें ।
स्वानंदें गुडिया ध्वजा उभविल्या दृष्टी फिटे पारणें ॥
चौवाटी बिदि रुंद हाट वाटियां वृंदावनीं देउळीं ।
शास्त्रें वेद पुराण गायन कथा होतीं अयोध्येस्थळीं ॥२०॥

सडे नानातैलें बहु उधळिले रंग धरणीं ।
विराजे श्रृंगारें अमृत नगरी पुण्य करणी ॥
महाद्वारीं मूर्ती कलश जलपूर्ण स्थिति बरें ।
दधी दूर्वांकूरीं भरुनि वरुते कुंभ दुसरे ॥ २१ ॥

सुमित्रा कौसल्या भरतजननी हास्य वदना ।
महालक्ष्मी केली गृहभरुनिया सौख्य नयना ॥
सुना चौघी चारी सुत जवळि आनंद भरिता ।
द्विजां देती दानें कविवर करी पूर्ण चरिता ॥ २२ ॥

स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके नव्याण्णवूं पधरा ।
अब्दीं पिंगल चैत्रशुद्ध नवमी श्लोकांक सख्या धरा॥
त्रीषट्कें शिवनेत्र श्लोक रचना संपूर्ण झाली कथा ।
वक्ता सतकवि[illegible] म्हणे दोषा क्षमा नान्यथा॥१२३॥

मराठी ग्रं
ठाणे

# श्रीमद्भगवद्गीता.

## भाषाविवृति–मराठी भाषांतर–सहित.

( द्वितीयावृत्ति. )

वेदांतशास्त्रज्ञ व विद्वन्मान्य रघुनाथ शास्त्री पर्वते ह्यानीं, शांकर भाष्यादि अनेक संस्कृत आणि महाराष्ट्र टीकाच्या आधारानें तयार केलेली. ही आवृत्ति शुद्ध करून रायल अष्टपत्री बुक उत्तम कागदावर मोठ्या अक्षरानें छापून तयार आहे. कि. रु. ४ ट. ५ आणे.

---

# श्रियाळचरित्र.

हें नवीन गद्यरूप लिहिलेलें उत्तम बोधपर आहे कि. १॥ आणा. ट. अर्धा आणा. दहा प्रतींस ट ख न पडता १ प्रत वर मिळेल.

---

# ध्रुवचरित्र.

( नवीन गद्यरूप )

श्रेष्ठकुलांतील उत्तमबीजांकुर ध्रुव, बाळपणींच जगद्व्यापक ईश्वरास शरण जाऊन, तो इहपर अक्षयसुखास लाधला हें त्याच्या सद्बुद्धिधैर्याचें, व सत्समागमाचें फल होय इत्यादि सुरस कथानक प्रसिद्धच आहे कि २ आणे ट ख. अर्धा आणा

दहा प्रति घेणारास ट. ख न पडता एक प्रत वर मिळेल.

---

# सीतामंदोदरीभेट.

हेंही नवीन गद्यरूप लिहिलेलें आहे यांत–शत्रु असून तो जर गुणी असला तर प्रिय होतो ह्याचें स्पष्टीकरण आहे कि. १ आणा

---

# सार्थ शिवगीता.

वर श्लोक व खालीं शुद्ध मराठी भाषांतर खिशांत रहाणारें उत्तम टाइपांनीं छापलेलें रेशमी बुक कि १ रु ट ख २ आणे

# सार्थ गणेशगीता.

वर श्लोक व खालीं मराठी भाषांतर विशद रहाणारें उत्तम टाईपांनीं छापलेलें रेशमी बुक कि० ०।१२ आणे. ट० ख० ० आणे

# यशोदानंद—शांतवन—छापत आहे.

# शालोपयोगी पुस्तकें.

| हीं सर्व पुस्तकें उत्तम टाइपांनीं चांगल्या कागदावर सुशोभित छापिलीं आहेत | कि० आ० | ट० पै० |
|---|---|---|
| सचित्राक्षरबोध .. | १ | ६ |
| मराठी पहिल्या व दुसऱ्या पुस्तकांतील कठीण शब्दार्थ व कवितान्वयार्थ .. | २ | ६ |
| मराठी तिसऱ्यापुस्त० कठिण शब्दार्थ व कवितान्वयार्थ | ३ | ६ |
| म० चौथ्यापु० कठिण शब्दार्थ व कवितान्वयार्थ .. | ४ | ६ |
| म० पांचव्या पुस्तकांतील कवितान्वयार्थ | ७ | १२ |
| मोडी पहिल्या पुस्तकांतील शब्दार्थ ... | १ | ६ |
| दुसऱ्या ,, ,, | १ | ६ |
| तिसऱ्या ,, ,, | १ | ६ |
| म० पांचव्या पु० शब्दार्थ ... | ४ | ६ |
| मुंबई इलाख्याचें नवीन भूगोलपत्रक ( बुक ) | ०॥। | ६ |
| हिंदुस्थानचें नवीन भूगोलपत्रक ,, | ०॥। | ६ |
| एशिया व युरोप भूगोलपत्रक | १ | ६ |
| आफ्रिका व अमेरिका भूगोलपत्रक | १॥ | ६ |
| हावर्ड्कृत, इं० प० पु० उच्चार, व्याकरण स० शब्दसंग्रह | १ | ६ |
| इं० दुसऱ्या पुस्तकांतील उ० व व्या० स० शब्दसंग्रह | २॥ | ६ |
| नीतिमंजुषा— (मुलांस व्यवहार समजण्याचें उत्तमसाधन) | ५ | ६ |
| रायल स्कूल प्रायमरचें मिनिंग स्पष्टीकरण सहित | २ | ६ |

ह्यांहून इतर सर्व जातीचे पुस्तकांचा क्याटलाग ( अर्धा आणा पोष्टेज पाठविलें कीं ) फुकट मिळतो.

व्याप्युक्त्र व इतर पुस्तकें प्रसिद्ध आहेत.

**जनार्दन महादेव गुर्जर.**

रामवाडी, मुंबई.

REFBK-0000154